७० वर्ष
निर्भीड पत्रकारीतेची

दैनिक **संध्या**
नि:पक्ष समीक्षणाचे....निर्भीड दैनिक

गुरुवार, दि. १६ एप्रिल २०२६

www.dainikesandhya.com
www.youtube.com/@sandhyalivenews




संस्थापक : कै. वसंत काणे | नोंदणी क्रमांक : १६६३/१९५७ | पुणे आवृत्ती | पाने : ८ | अंक : १११ | Gmail : news.sandhya@gmail.com | किंमत : ७ रूपये

# निरंतर शिकण्याची वृत्ती आत्मसात करा

**नागपूर (दै. संध्या)**



वैद्यकीय क्षेत्रात सेवाभावाबरोबरच आयुष्यभर शिकत राहण्याची वृत्ती जपायला हवी. वैद्यकीय क्षेत्रात नैतिक मूल्यांचे स्थान सर्वतोपरी आहे. जिज्ञासा, संशोधन आणि सतत शिकत राहण्याची वृत्ती आत्मसात करा. तंत्रज्ञान कितीही प्रगत झाले तरी ते करुणा, प्रामाणिकपणा आणि रुग्णकेंद्रित दृष्टिकोनाची जागा घेऊ शकत नाही. वैद्यकीय क्षेत्रात यशासह करुणेचा भाव जपल्यास तुम्ही एक उत्तम व्यक्तीही होऊ शकाल, असे प्रतिपादन राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी आज येथे केले.

केंद्रीय आयुर्विज्ञान संस्थेचा (एम्स) द्वितीय दीक्षान्त समारंभ आज संस्थेच्या सभागृहात आयोजित करण्यात आला. यावेळी राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी आपले हे विचार मांडले. या समारंभात राज्यपाल जिष्णू देव वर्मा, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, केंद्रीय सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण राज्यमंत्री प्रतापराव जाधव, नागपूर एम्सचे अध्यक्ष डॉ. अनंत पांढरे, कार्यकारी संचालक डॉ. प्रशांत जोशी व्यासपीठावर उपस्थित होते.

उपस्थित वैद्यकीय विद्यार्थ्यांना संबोधित करताना राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू म्हणाल्या की, वैद्यकीय क्षेत्र हा केवळ एक व्यवसाय नसून संवेदनशीलतेने मानवतेची सेवा करण्याचा एक मार्गही आहे. एक वैद्यकीय चिकित्सक केवळ आजारांवर उपचार करत नाही, तर तो आजाराने ग्रासलेल्या व्यक्तीच्या मनात आशेचा संचारही निर्माण करतो. चिकित्सकाचा सहानुभूतीचा सल्ला केवळ आजारी व्यक्तीलाच नव्हे तर त्याच्या कुटुंबीयांनाही आधार देतो. अनेकदा डॉक्टरांसमोर कठीण परिस्थिती निर्माण होते. मात्र, अशा परिस्थितीतही रुग्ण आणि त्यांच्या कुटुंबीयांप्रती संवेदनशील राहणे आवश्यक आहे. रुग्ण आणि त्यांच्या नातेवाईकांनी देखील आरोग्य कर्मचाऱ्यांशी नेहमी सन्मानाने वागायला हवे. डॉक्टर आणि रुग्ण यांच्यातील विश्वास टिकवून ठेवण्यासाठी हे गरजेचे आहे, असा मोलाचा सल्लाही राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी यावेळी दिला.

आरोग्य सेवा क्षेत्र सातत्याने बदलत आहे. जगभरात नवनवीन तंत्रज्ञान, कृत्रिम बुद्धिमत्ता, डिजिटल आरोग्य सेवा आणि प्रगत संशोधनाच्या माध्यमातून वैद्यकीय क्षेत्रात अभूतपूर्व प्रगती होत आहे. आपण हे बदल आत्मसात करून पुढे वाटचाल केली पाहिजे. तंत्रज्ञान विकासाचा उपयोग ग्रामीण आणि शहरी भागांतील आरोग्य सुविधांची दरी कमी करण्यासाठी आणि सर्वांना दर्जेदार आरोग्य सेवा प्रदान करण्यासाठी केला पाहिजे, याकडे त्यांनी लक्ष वेधले.

गेल्या दशकभरात केंद्र सरकारने आरोग्य सेवांच्या क्षेत्रात अनेक महत्त्वाची पावले टाकली आहेत. 'आयुष्मान भारत योजना, 'आयुष्मान आरोग्य मंदिरा'ची स्थापना, डिजिटल हेल्थ मिशन, लसीकरण कार्यक्रमांचा विस्तार, गंभीर आजारांच्या नियंत्रणासाठी राष्ट्रीय टीबी निर्मूलन कार्यक्रम, राष्ट्रीय असंसर्गजन्य रोग आणि राष्ट्रीय कुष्ठरोग निर्मूलन कार्यक्रम राबवले जात आहेत. लोकांना स्वस्त आणि दर्जेदार औषधे उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने 'अमृत' फार्मसी आणि जन औषधी केंद्र उघडण्यात आली आहेत, असा उल्लेखही राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी आपल्या भाषणात केला.

मधुमेह, उच्च रक्तदाब, हृदयविकार आणि कर्करोगासारख्या जीवनशैलीशी निगडित आजारांमध्ये सध्या मोठी वाढ होत आहे. नैराश्य, चिंता आणि व्यसनाधीनते सारख्या मानसिक आजारांच्या समस्यांकडेही गांभीर्याने लक्ष पुरविण्याची गरज निर्माण झाली असून आयुष्यमान भारत सारख्या योजनांमुळे लोक दर्जेदार आरोग्य सेवांचा लाभ घेण्यासाठी शासकीय रुग्णालयांकडे वळत आहेत, असे प्रतिपादन राज्यपाल जिष्णू देव वर्मा यांनी यावेळी बोलताना केले.

# पुढील चार दिवस राज्यात उष्णतेची लाट; १८, १९ तारखेला पावसाची शक्यता

**पुणे (दै. संध्या)**



राज्यात तापमानाचा पारा वाढला आहे. त्यात अकोला शहरात सगळ्यात जास्त तापमानाची नोंद झाली आहे. मात्र 17 एप्रिल हा दिवस एप्रिल महिन्यातील सगळ्यात उष्ण दिवस असण्याची शक्यता आहे. कारण अर्ध्या महाराष्ट्रात उष्णतेची लाट येण्याचा इशारा हवामान खात्याने वर्तवला आहे. त्यात पुणे शहराचे तापमान देखील वाढण्याची शक्यता आहे. मात्र 18 आणि 19 एप्रिलला या उकाड्यापासून नागरिकांना काहीसा दिलासा मिळणार आहे, काही ठिकाणी पावसाचा इशारा देखील देण्यात आला आहे. पुढील दोन दिवस प्रत्येक शहरात 1 ते दोन अंशाने तापमान वाढणार असल्याची हवामान खात्याची माहिती आहे.

उष्णतेच्या लाटेत कशी काळजी घ्याल?

- पुरेसे पाणी प्या, तहान लागलेली नसली तरीही दर अर्ध्या तासाच्या फरकाने पाणी प्या.
- उन्हात काम करत असल्यास ओल्या कपड्याने डोके मान चेहरा झाकून ठेवा. सूर्यप्रकाशाचा थेट संपर्क टाळावा.
- टरबूज, खरबूज, संत्री, द्राक्षे, अननस, काकडी व स्थानिक उपलब्ध पाणीदार फळे आणि पाणीदार भाज्या यांचा आहारात समावेश करा.
- घर थंड ठेवण्यासाठी खिडक्यांना पडदे लावा, रात्री खिडक्या उघड्या ठेवा आणि गारव्यासाठी पंखे किंवा ओल्या कपड्यांचा वापर करा.
- हलकी, पातळ व सच्छिद्र सुती कपडे वापरावेत.
- घराबाहेर पडताना डोके झाकण्यासाठी छत्री, टोपीचा आणि गॉगल वापर करा.
- ओआरएस (ORS), घरी बनवलेली लस्सी, कोशिंबीर, कैरीचे पन्हे, लिंबू-पाणी किंवा ताक यांचा नियमित आहारात वापर करा.


क्युआर स्कॅन करून दै. संध्याच्या युट्युब चॅनलला सबस्क्राईब करा
SUBSCRIBE
www.sandhyaepaper.com

## ढिंग-टांग




# ठाकरे गटाच्या नगरसेविका लक्ष्मी भाटिया यांच्या पर्समधून रोकड लंपास

**मुंबई (दै. संध्या)**



मुंबई महापालिकेच्या स्थायी समितीत चोरीची घटना घडल्याचा दावा केला जात आहे. शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या नगरसेविका लक्ष्मी भाटिया यांच्या पर्समधून 20 हजार रुपयांची रोकड लंपास करण्यात आल्याचा आरोप करण्यात आला आहे. संबंधित प्रकार समोर आल्यानंतर एकच खळबळ उडाली आहे. स्थायी समितीची आज बैठक पार पडली. या बैठकीसाठी लक्ष्मी भाटिया आल्या होत्या. त्यांनी स्थायी समितीच्या सभागृहात आपली पर्स ठेवली होती. त्या तिथे पर्स ठेवून जेवायला गेल्या होत्या. पण जेवून आल्यानंतर पर्सला पाहिले असता पर्सची चैन उघडी होती. त्यांनी पर्स चेक केली असता त्यामधून 20 हजार रुपयांची चोरी झाल्याचं त्यांच्या लक्षात आलं. याबाबत त्यांनी आपल्या सहकारी असणाऱ्या इतर नगरेसकांना संबंधित प्रकार कळवला. पण घटना घडली तिथे कोणत्याही प्रकारचे सीसीटीव्ही नसल्यामुळे या घटनेची खात्री करणे कठीण आहे. या कथित चोरीच्या घटनेची माहिती पोलिसांना देण्यात आली आहे. तसेच एमएस विभाग आणि सुरक्षा विभागालादेखील या घटनेची माहिती देण्यात आली आहे. यासोबतच महापौर, विरोधी पक्ष आणि स्थायी समिती सदस्यांना या घटनेची माहिती कळवण्यात आली आहे. तसेच या घटनेनंतर लक्ष्मी भाटिया यांना पर्ससोबत छेडछाड झाल्याचा संशय आल्यानंतर त्यांनी इतर सहकारी नगरसेविकेला देखील संबंधित प्रकार लक्षात आणून दिला. यावेळी पर्समधून पैसे चोरी गेल्याचं लक्ष्मी भाटिया यांच्या लक्षात आलं. स्थायी समितीच्या सभागृहात अशाप्रकारे चोरीचा हा पहिलाच प्रकार आहे. या प्रकरणी आता पोलीस काय कारवाई करतात? ते पाहणं महत्त्वाचं आहे. या घटनेवर लक्ष्मी भाटिया यांनी आपली प्रतिक्रिया दिली आहे.

# सुनेत्रा पवार यांना निवडून आणणे हे भाजपचे कर्तव्य

**माळेगाव (दै. संध्या)**




महाराष्ट्रात राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्ष हा सत्ताधारी भाजपचा सहयोगी पक्ष म्हणून कार्यरत आहे. त्यामुळे उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांना बारामती विधानसभा पोट निवडणूकीमध्ये विक्रमी मताधिक्याने निवडून आणणे आमचे कर्तव्य आणि जबाबदारी आहे. त्यानुसार बारामतीत भाजपची ताकद सुनेत्रा पवार यांच्या पाठीशी उभा करण्याचे काम आम्ही करीत आहे. त्यामुळे सध्याला बारामतीत भाजपच्या प्रचार कामाला सन २०२९ ची तयारी संबोधने योग्य नाही, अशी भूमिका उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांनी स्पष्ट केली.

उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या निधनानंतर बारामती विधानसभेची जागा रिक्त झाली आहे. त्या पार्श्वभूमीवर लागलेल्या पोट निवडणूकीत महायुतीच्या अधिकृत उमेदवार व राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टीच्या वरिष्ठ नेत्या सुनेत्रा पवार निवडणूक लढवित आहेत. त्यांच्या प्रचारार्थ मंत्री चंद्रकांत पाटील पणदरे, सांगवी (ता. बारामती) येथे आज आले होते. पणदरे येथे झालेल्या पत्रकार परिषदेमध्ये श्री. पाटील बोलत होते. दिवंगत नेते अजितदादांचे लोकाभिमुख कार्यच एवढे मोठे आहे, की त्यांच्या पत्नी सुनेत्रा पवार निवडणूक येणे फारसे आवघड नाही. मुद्दा ऐवढाच आहे, की या निवडणूकीत मतदानाचा टक्का वाढविणे आणि विक्रमी मताधिक्याने श्रीमती सुनेत्रा यांना निवडून आणायचं आहे. त्यामुळे युती धर्म विचारात घेऊन आम्ही बारामतीच्या पोट निवडणूकीत भाजपाची पुर्ण शक्ती राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टीच्या नेत्या सुनेत्रा पवार यांच्या पाठीशी उभी केली आहे,` अशी माहिती मंत्री पाटील यांनी स्पष्ट केली.

भाजपाचे वरिष्ठ नेते सुनेत्रा पवार यांना मुख्यमंत्री करू शकतात का, असा सवाल केला असता मंत्री पाटील म्हणाले, मुख्यमंत्री देवेंद्र फडणविस सध्याला शेतकऱ्यांसह विविध घटकांना चांगला न्याय देतात. राहिला प्रश्न मुख्यमंत्रीपदाचा. शेवटी भाजप, राष्ट्रवादी, शिवसेना आदी सत्तेतल्या पक्षाच्या मंत्र्यांना अथवा कार्यकर्त्यांना वाटत असते, की आपल्या पक्षाचा मुख्यमंत्री आजनाउद्या व्हावा. अर्थात मुख्यमंत्रीपदाचे स्वप्न पहाणे यात काहीही चूक नाही. राजकारणात अशक्य काही नसते. त्यामुळे भविष्याचे आज कोणालाच काहीही सांगता येत नाही.

'राष्ट्रवादी कॉंग्रेस शरद पवार पक्षाचे आमदार रोहित पवार यांनी बारामतीत महायुतीच्या उमेदवाराचा प्रचार करण्यात काहीही गैर नाही. त्यांचा हा कौटुंबिक विषय आहे, असेही मंत्री पाटील यांनी बोलून दाखविले. यावेळी ज्येष्ठ नेते बाळासाहेब गावडे, जिल्हाध्यक्ष शेखर वडणे, सदाशिव खाडे, अविनाश मोठे, अॅड. शाम कोकरे, सतिश फाळके, युवराज तावरे, नवनाथ पडळकर, पांडुरंग कचरे आदी पदाधिकारी उपस्थित होते.

## ब्रेकिंग न्यूज


### बोगस ग्राहकाचा सापळा

पुणे (दै. संध्या) : पुण्यातील बारामतीत एक मोठा संतापजनक प्रकार उघडकीस आला आहे. शहराच्या बाहेरील वंजारवाडी परिसरातील अमृता लॉजवर लॉजच्या आड सुरू असलेला देहव्यवसायाचा अड्डा पोलिसांनी पहाटेच्या सुमारास उद्ध्वस्त केला. गुप्त माहितीच्या आधारे पोलिसांनी नियोजनबद्ध कारवाई करत बोगस ग्राहकाच्या मदतीने सापळा रचला आणि अचानक छापा टाकत संपूर्ण रॅकेट उघडकीस आणलं. छाप्यादरम्यान लॉजमधील विविध खोल्यांमध्ये संशयास्पद हालचाली आढळून आल्या. तपासात समोर आलं की आरोपी बाहेरून महिलांना आणून ग्राहकांना पुरवत होते आणि त्यातून आर्थिक फायदा मिळवत होते. पोलिसांनी तत्काळ कारवाई करत दोन जणांना अटक केली, तर पाच महिलांची सुटका करण्यात आली. कारवाईदरम्यान रोख रक्कम, मोबाईल फोन आणि ग्राहकांची नोंद असलेली वही असा मुद्देमाल जप्त करण्यात आला. या घटनेमुळे परिसरात खळबळ उडाली असून संबंधितांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सध्या पोलीस पुढील तपास करत आहेत.

**दै. संध्या अँकर** माणसं बदलल्याने पक्ष मजबूत होणार नाही : दानवेंचा ठाकरेंना टोला

# विचार बदलला म्हणून मरणआवकळा आली

**मुंबई (दै. संध्या)**



शिवसेना ठाकरे गटाचे युवासेना प्रमुख आदित्य ठाकरे यांना नवी जबाबदारी लवकरच दिली जाणार असल्याची चर्चा राजकीय वर्तुळात सुरु आहे. आदित्य ठाकरे यांना लवकरच कार्याध्यक्षपदाची धुरा दिली जाऊ शकते. आदित्य ठाकरे सध्या पक्षात घेत असलेल्या जबाबदाऱ्या, त्यांनी आतापर्यंत लोकसभा, विधानसभा आणि महापालिका निवडणुकीसाठी केलेलं काम पाहता त्यांना हे पद दिले जाण्याची चर्चा सुरू झाली. यावरुन भाजप नेते आणि माजी केंद्रीय मंत्री रावसाहेब दानवे यांनी टीका केली आहे. माणसं बदलून चालणार नाही, तुमचा विचार बदलला म्हणून तुमच्यावर मरणआवकळा आल्याची टीका दानवे यांनी केली. आदित्य ठाकरे यांना लवकरच कार्याध्यक्षपदाची जबाबदारी दिली जाण्याची चर्चा राजकीय वर्तुळात सुरु आहे. याच मुद्यावरुन रावसाहेब दानवे यांनी आदित्य ठाकरे यांच्यावर टीका केली. माणसं बदलून चालणार नाही, तुमचा विचार बदलला म्हणून तुमच्यावर मरणआवकळा आल्याची टीका दानवे यांनी केली. विचार बदलले म्हणूनच तुमची ही हालत झाली आहे. बाळासाहेब ठाकरे होते तेव्हाचा पक्ष आणि उद्धव ठाकरे आले तेव्हाचा पक्ष आणि आता आदित्य ठाकरे येऊ लागलेत. विचाराला तुम्ही मुठमाती दिली आणि माणसं बदलायला लागलात, माणसं तर तुमच्याबरोबर राहिली पाहिजेत असा टोला दानवेंनी आदित्य ठाकरे यांना लगावला. किती नगरपालिका महानगरपालिका आणि जिल्हा परिषद तुमच्या निवडून आल्या? असा सवाल देखील रावसाहेब दानवे यांनी ठाकरेंना केला. माणसे बदलल्याने पक्ष संघटना मजबूत होत नसते. त्यांनी विचार बदलले, विचार बदलायला नको होता असे दानवे यावेळी म्हणाले. ठाकरेंच्या शिवसेनेमध्ये आदित्य ठाकरे यांना कार्याध्यक्षपदाची नवी जबाबदारी दिली जाऊ शकते, अशी चर्चा सध्या पक्षात सुरू असल्याची माहिती समोर आली. आदित्य ठाकरे यांनी लोकसभा विधानसभा आणि त्यानंतर महापालिका निवडणुकीच्या दरम्यान केलेले काम, उद्धव ठाकरे यांच्या नेतृत्वाखाली आणि मार्गदर्शनाखाली घेतलेल्या जबाबदाऱ्या या सगळ्याचा विचार करता त्यांना हे पद दिलं जाऊ शकतं अशी चर्चा आहे. सद्यस्थितीत आदित्य ठाकरे यांच्या शिवसेनेचे नेते त्यासोबतच युवासेना प्रमुख आहेत. मंत्री म्हणून सुद्धा महाविकास आघाडीचे सरकार असताना त्यांनी काम बघितलं आहे. त्यामुळे प्रशासकीय अनुभवसुद्धा आदित्य ठाकरेंना आहे. दोन टर्मचे ते आमदार आहेत. पक्षातील अनेक महत्त्वाच्या निर्णयांमध्ये त्यांचा सहभाग असतो, शिवाय राज्यभरात पक्ष बांधणीसाठी आणि संघटनात्मक निर्णयांसाठी सुद्धा त्यांचा पुढाकार असतो. निवडणुकांमध्ये प्रचाराची धुरा असू द्या किंवा पक्षाची रणनीती, आदित्य ठाकरे यांचा त्यात सहभाग असतो.

उद्धव ठाकरे यांच्यानंतर ते वेळोवेळी पक्षाची भूमिका मांडताना पाहायला मिळतात. त्यामुळे ज्या प्रकारे 2003 साली उद्धव ठाकरे यांना शिवसेनेमध्ये कार्याध्यक्षपद दिलं होतं आणि तशाच प्रकारे आदित्य ठाकरे यांना सुद्धा जून महिन्यात पक्षाच्या वर्धापनदिनी हे पद दिले जाईल अशी चर्चा आहे.

# लोकसभेतील खासदारांची संख्या ८५० होणार? मनसेनं सांगितला धोका

**मुंबई (दै. संध्या)**



देशाच्या राजकीय वर्तुळात सध्या चर्चा आहे ती 2029 च्या लोकसभा निवडणुकीत वाढणाऱ्या खासदारांची. देशातील लोकप्रतिनिधित्व अधिक समतोल आणि व्यापक करण्यासाठी केंद्र सरकारने मोठा निर्णय घेतला आहे. लोकसभेतील एकूण जागा 545 वरुन 850 पर्यंत वाढवण्याचा प्रस्ताव तयार करण्यात आला असून यासाठी संविधान (131 वी दुरुस्ती) विधेयक 2026 संसदेत मांडले जाणार आहे. या प्रस्तावानुसार 815 जागा राज्यांसाठी तर 35 जागा केंद्रशासित प्रदेशांसाठी राखीव ठेवण्यात येणार आहेत. संसदीय कार्य राज्यमंत्री अर्जुन राम मेघवाल यांच्या माध्यमातून हे विधेयक सादर होणार आहे. मात्र, या विधेयकावरुन मनसेनं चिंता व्यक्त केली आहे. तसेच, हिंदी भाषिक राज्यांची पकड देशाच्या कारभारावर घट्ट होईल, अशी भूमिका मनसेनं व्यक्त केलीय.

मनसेचे नेते आणि प्रवक्ता अनिल शिदोरे यांनी लोकसभा खासदारांच्या वाढीव संख्येवरुन मराठीसह इतर प्रादेशिक भाषांसाठी धोक्याची घंटा असल्याचे म्हटले आहे. दिल्ली सरकारनं प्रस्तावित केल्याप्रमाणे लोकसभेच्या खासदारांची संख्या वाढली तर हिंदी भाषिक राज्यांची देशाच्या कारभारावरची पकड अधिकच घट्ट होणार आहे. हिंदी भाषा नसलेल्या राज्यांची देशाच्या कारभारात फार डाळ शिजणार नाही. लोकसंख्या हा निकष मानून लोकसभा मतदारसंघ ठरवले तर ज्या राज्यांनी लोकसंख्या नियंत्रित ठेवून देशाच्या विकासात हातभार लावला त्यांच्या खासदारांची संख्या कमी होणार. म्हणजे मुख्यत: बिगर हिंदी भाषिक खासदारांची. ह्यामुळे देशाच्या राजकारणात तीव्र ताणतणाव निर्माण होणार ह्यात शंका नाही. दरम्यान, हा प्रस्ताव नारी शक्ति वंदन अधिनियम लागू करण्यासाठी महत्त्वाचा मानला जात आहे. या अंतर्गत लोकसभा आणि राज्य विधानसभांमध्ये 33 टक्के महिला आरक्षण लागू होणार आहे. डिलिमिटेशन प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर महिलांसाठी एक-तृतीयांश जागा राखीव केल्या जातील. या जागांचे रोटेशन केले जाईल आणि आरक्षणाची मुदत 15 वर्षे ठेवण्यात येणार आहे. या विधेयकामुळे लोकसभेच्या संरचनेत मोठा बदल होणार आहे.

# संपादकीय

## चंद्रावर जाऊन या फक्त १० दिवसांत!

नासाने चंद्रावर अपोलो मोहिमेच्या माध्यमातून अनेक मोहिमा केल्या. त्यातील अपोलो ११ ही सर्वाधिक चांगली मानव मोहिम होती, ज्यात जगात प्रथमच मानव चंद्रावर उतरला. परंतु, त्यानंतर अनेक वर्षे अमेरिका चंद्रावर गेली नाही आणि भारतासह इतर अनेक देश चंद्रावर यान पाठविण्याचा प्रयत्न करू लागले. कित्येक वर्षांनंतर नासाने २०२६ मध्ये एक अवकाशयान सोडण्याचा प्रयत्न केला. कदाचित अलीकडे अवकाश पर्यटनाची जगाची इच्छा असल्याने आर्टेमिस २ हे अवकाश पर्यटनाची संधी मिळवून देणार नाही, असे माझे मत आहे. १ एप्रिल रोजी नासाचे आर्टेमिस २ नावाचे अवकाशयान ४ अवकाशयात्रींच्या सान्निध्यात चंद्रप्रवासाला निघाले. त्यांत रीड वाईसमन, विक्टर ग्लोव्हर, ख्रिस्तीना कोच आणि जेरेमी हॅन्सेन या ४ अवकाशयात्रींचा समावेश होता. खरं तर ही मानवी उतरणीची मोहीम नव्हती; केवळ पृथ्वी आणि विशेषतः चंद्र प्रदक्षिणा होती. त्याला फ्लाय-बाय मिशन म्हणतात. दहा दिवसांच्या कालावधीची ही मोहीम होती. १९७२ नंतरची ही दुसरी चांद्रमोहीम होती. ही पहिली अशी मोहीम होती ज्यात ४ अवकाश संशोधक व वैमानिकांनी दूरच्या अवकाशाच्या आत आणि बाहेरून अभ्यास, पृथ्वी आणि चंद्र भ्रमण केले. अवकाश क्षेत्राच्या दृष्टीने ही आर्टेमिस मोहीम खूप महत्त्वाची होती. अवकाशयात्रींनी लो-अर्थ ऑर्बिटमध्ये फिरून पृथ्वीची पाहणी आणि अभ्यास केला. मंगळाकडे प्रत्यक्ष अभ्यास करत जाण्याची संधी मिळाली. पृथ्वीची अदृश्य बाजू अंतराळवीरांना पाहता आली. आपण पृथ्वीवरून चंद्रग्रहण पाहतो, त्याच वेळी त्यांना सूर्यग्रहण पाहण्याची संधी मिळाली.

भारत सरकारने उशिरा का होईना, चंद्रयान मोहिमेची अतिशय सक्षमतेने सुरुवात केलेली आहे. आपण आजपर्यंत चंद्रावर मानवी मोहीम करू शकलो नाही. येत्या २०३० पर्यंत भारत चंद्रावर निश्चितच पोहोचेल. यामुळे पृथ्वीच्या बाह्य आवरणाचा, पृथ्वीवर पडणाऱ्या उल्कावर्षावांचा, चंद्रावरील खडक, खनिजे, आवरण, विवरे, पाणी, बर्फ, ग्रहणे अशा विविध वैज्ञानिक बाबी समजून घेण्यात आणि गोळा करण्यात नासाच्या आर्टेमिस २ मोहिमेचा भारताला फायदा मिळणार आहे.

विशेष म्हणजे आर्टेमिस २ चे वीर अगदी पर्यटनाच्या पद्धतीने गेले आणि आले, हे नक्की. म्हणूनच या मोहिमेद्वारे जागतिक अवकाश क्षेत्राचा आणि त्याकडे पाहण्याचा दृष्टीकोन बदलणार आहे. विज्ञान, भूशास्त्र, वातावरण, खनिजे ही जरी मोहिमेची उद्दिष्टे असली तरी माझ्या मते अवकाश पर्यटन हा सुद्धा मोठा उद्देश आहे. या मोहिमेच्या आधारे भारतीय इस्रो संस्थेला फार मोठा फायदा मिळणार असून पुढे मानवी मोहीम पाठविण्यासाठी मदत होणार आहे. भारताने गेल्या दोन दशकांत अंतरिक्ष मोहिमेसाठी खूप चांगले प्रयत्न केले. २००८ मध्ये पहिली चंद्र मोहीम भारताने यशस्वी करून दाखवली आणि अचानक देशाचे नाव जगभर प्रसिद्ध झाले. भारताने पहिल्याच मोहिमेत चंद्रावर पाणी असल्याचे सिद्ध केले आणि नासासह सर्व देशांनी इस्रो या भारतीय अवकाश संस्थेची दखल घेतली. २०१९ मध्ये इस्रोने चंद्रावर उतरणारे यान पाठविले, परंतु त्याचे उतरणारे उपकरण पडले. यात थोडीशी असफलता मिळाली असली तरीही एकूण प्रयत्न यशस्वी ठरले. २०२३ मध्ये पुन्हा तिसरे चंद्रयान यशस्वीरीत्या पाठविले आणि चंद्रावर उतरले सुद्धा. देशाची ही पहिलीच यशस्वी चंद्रमोहीम ठरली. २०२८ मध्ये चंद्रयान ४ ची तयारी सुरू आहे. ती चंद्रावरील दगड पृथ्वीवर आणण्याची मोहीम असणार आहे. यानंतर मात्र भारत चंद्रयान ५ ही मानवी मोहीम राबविणार आहे. अशा मोहिमा सुरू राहिल्या तर विज्ञान क्षेत्राकडे पाहण्याचा आपला दृष्टिकोन निश्चित बदलेल. पृथ्वीवर उद्योग आणि विकास प्रक्रिया खूप पुढे गेली असली तरी अजून अवकाश संशोधन, उद्योग आणि पर्यटन क्षेत्रात आपण खूप मागे आहोत. त्यामुळे विविध विषयांवर संशोधन होण्यासाठी अशा मोहिमा अत्यावश्यक आहेत. म्हणूनच भविष्यात आर्टेमिसच्या पुढील मोहिमांचे आगळे-वेगळे फायदे सर्व देशांना मिळतील.

## संस्कृत सुभाषित

न गृहं गृहामित्या दुर्गुहिणी गृहमुच्यते ।

अर्थ– घर म्हणजे गृहिणी, तिच्याशिवाय घर हे घर नव्हे तर ते अरण्य, पत्नी केवळ पत्नीच नसते. तिचे स्थान फार मोठे आहे. पतीच्या कुटुंबाच्या, सर्वांच्या जीवनात ती सर्वांना संतुष्ट करणारी देवताच असते.

## गुरु वचन

### सर्वोत्कृष्ट भक्ती मार्ग – आचार्य दिव्यचेतनानंद

विद्वानांनुसार, ईश्वर प्राप्तीचे ३ मार्ग आहेत–ज्ञान, कर्म व भक्ती. खरंतर हेच ज्ञान आहे की, ज्या माध्यमातून ईश्वर कोण आहे? हे आपण जाणतो. ज्ञानाचा संग्रह आपल्या मेंदूत असतो व निर्विवादपणे हे आपणास ईश्वरकडूनच मिळते. मानवाचा मेंदू छोटा असतो मग अशा स्थितीत तो ईश्वराला कसा जाणू शकेल? हा प्रश्न निर्माण होतो. वास्तवात मेंदूत असलेल्या ज्ञानानेच हे शक्य होऊ शकते. ज्ञानामुळे मन तृप्त होते. श्रीआनंदमूर्तिके यांच्यानुसार, जोपर्यंत मानवात ज्ञानाची जाणीव राहिल तोपर्यंत त्याने ज्ञान ग्रहण करत राहिले पाहिजे. एका मर्यादेनंतर आपल्या ज्ञानाची भूक मंदावते कारण तोपर्यंत आपले लक्ष्य ईश्वर प्राप्ती होते.

काही विद्वान मानतात की, कर्मामुळे ईश्वर प्राप्ती होते कारण कर्म न करता मनुष्य एक क्षण सुद्धा जिवंत राहू शकत नाही. म्हणून आपण कर्म करत राहिले पाहिजे पण कर्म चांगले असायला हवेत. गीतेत प्रभू श्रीकृष्णाने मानवास कुठल्याही फळाची अपेक्षा न करता कर्म करत राहण्याचा सल्ला दिला आहे. सांगण्याचे तात्पर्य धार्मिक व आध्यात्मिक जगात ज्ञानाला जेवढी किंमत आहे त्यापेक्षा कमी कर्माची नाही. विद्वान म्हणतात की, जर निर्मळ भावाने ईश्वराची भक्ती केली तर ते सहज मिळतील. खरंतर भक्ती मार्गाची कास मोठ–मोठ्या ज्ञानवंतांनी चोखाळली आहे. आपण सर्व मानतो की, सृष्टीची निर्मिती ईश्वरानेच केली आहे.

म्हणून जगातील प्रत्येक जीव परमात्म्याचे संतान आहे. जर आपण परमात्माला प्रसन्न करु इच्छित असाल तर त्यांची संतान म्हणजे प्रत्येक जीवप्रती प्रेम–भाव ठेवा व यासाठी आपण मानवसेवा व समाजसेवा केली पाहिजे तसेच निराधारांना आधार दिला पाहिजे. मानवसेवा करताना आपण नेहमी एक गोष्ट लक्षात ठेवली पाहिजे की, हा सर्व खटाटोप ईश्वर प्राप्तीसाठी केला जात आहे. खरंतर हीच भक्ती आहे. त्यामागे दुसरे कुठलेही कारण नाही. जर भक्तीभाव निर्माण झाला तर ईश्वर प्राप्तीचा मार्ग मिळाला, असे समजा.

## उपदेशकथा

### किंमत

एका राजाला आपल्या कर्तृत्वाचा फारच गर्व होता. त्याला फक्त स्वत:चीच स्तुती करायला आवडे. एकदा राजाकडे एक संतपुरुष आला. राजाने त्याचा आदरसत्कार केला पण पुन्हा तो स्वत:चेच गुणगान करू लागला. संत त्याला मध्येच थांबवत म्हणाले, 'राजा, समज तू भल्यामोठ्या वाळवंटात रस्ता चुकलास. उन्हाने हैराण, तहानेने व्याकूळ झालेल्या तुला जर त्यावेळी कोणी एक पेलाभर पाणी दिले आणि तुझा जीव वाचवला, तर तू त्याला काय देशील?' 'अर्थातच, माझे अर्धे राज्य!' राजा म्हणाला, 'जर तुझ्या अर्ध्या राज्याची आणि तुझ्या जिवाचीकिंमत फक्त एक पेलाभर पाणी आणि दोन औषधाच्या पुड्या असतील तर एवढा अहंकार कशाचा धरतोस?'

कथा उपदेश : संतपुरुषाच्या या वाक्याने राजाचे डोळे उघडले आणि अहंकार संपुष्टात आला.

## पंचांग

| | |
|---|---|
| पंचांग | १३:५८:३६ |
| १६ एप्रिल २०२६ | योग:ऐन्द्र १०:३६:५९ |
| गुरुवार | करण:विष्टि ०९:२५:५१ |
| विक्रम संवत्– २०८२ | करण:शकुनि २०:११:३७ |
| चैत्रशके संवत्– १९४८ | सूर्य:मेष |
| संवत्सर –पराभवनाम | चन्द्र:मीन |
| अयन– उत्तरायणारंभ | हिजरी सन् – १४४६ |
| मास– चैत्र | मुस्लिम मास – शव्वाल |
| ऋतु– सौर वसंत | तारीख –२७ |
| कृष्ण पक्ष | विशेष |
| तिथि:चतुर्दशी २०:११:३७ | अमावास्या प्रारंभ |
| नक्षत्र:उत्तराभाद्रपद | रात्रौ ८.११ |

## दै. 'संध्या' धमाल सूडोकु क्र. १२०

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | 2 | 9 | 1 | | | 7 | |
| 9 | | 1 | | | | 5 | | 4 |
| | 7 | | | 5 | | | | 2 |
| 7 | | 9 | | 2 | | 3 | 8 | |
| 5 | | 6 | | | | 4 | | 7 |
| | 2 | 4 | | 6 | | 1 | | 9 |
| 1 | | | | 8 | | | 6 | |
| 6 | | 7 | | | | 8 | | 5 |
| | 9 | | | 3 | 6 | 7 | | |

### : सूडोकु :

खेळाचे नियम : प्रत्येक उभी लाइन, आडवी लाइन आणि ३–३ च्या वर्गात १ ते ९ पर्यंतची संख्या भरा. परंतु ही अट आहे की, नंबरची पुनरावृत्ति कोणत्याही उभ्या किंवा आडव्या लाइन आणि चौकानात आली नाही पाहिजे. प्रत्येक कोडयाचे केवळ एकच उत्तर आहे.या कोडयाला भरण्यासाठी आपण पेन्सिलचा आणि खोड रबराचा उपयोग केला तर ते आपल्यासाठी अधिक सुविधा जनक होईल.

– उत्तर उद्याच्या अंकात

### सूडोकु क्र. ११९ चे उत्तर

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 8 | 2 | 3 | 5 | 6 | 1 | 7 | 9 | 4 |
| 5 | 4 | 7 | 2 | 8 | 9 | 3 | 1 | 6 |
| 9 | 1 | 6 | 3 | 7 | 4 | 5 | 8 | 2 |
| 3 | 8 | 5 | 4 | 1 | 6 | 9 | 2 | 7 |
| 2 | 6 | 1 | 9 | 3 | 7 | 8 | 4 | 5 |
| 4 | 7 | 9 | 8 | 5 | 2 | 1 | 6 | 3 |
| 6 | 3 | 2 | 1 | 9 | 5 | 4 | 7 | 8 |
| 7 | 9 | 8 | 6 | 4 | 3 | 2 | 5 | 1 |
| 1 | 5 | 4 | 7 | 2 | 8 | 6 | 3 | 9 |

## इतिहासात आजचा दिवस

### आंतरराष्ट्रीय

- ००६९ – बेड्रियाकमची लढाई – व्हिटेलियस रोमन सम्राटपदी.
- १५२१ – मार्टिन ल्युथरचे वर्मच्या डियेटसमोर भाषण. त्याने आपले तत्त्वज्ञान बदलण्यास नकार दिला.
- १८६१ – अमेरिकन गृहयुद्ध – व्हर्जिनीया अमेरिकेपासून विभक्त झाले.

### राष्ट्रीय

- १८५३ – बोरीबंदर ते ठाणे – भारतीय रेल्वेचा प्रारंभ.
- १९२२ – मुळशी सत्याग्रहाची सुरुवात.
- २००६ – छत्तीसगढमध्ये नक्षलवाद्यांच्या हल्ल्यात १० सुरक्षा सैनिक ठार झाले.
- २००८ – गुजरातमधील बोडेली गावात प्रवासी बस नर्मदा नदीच्या कालव्यात कोसळून ४६ जण ठार झाले.

### जन्म

- ०५९३ – जोमेइ, जपानी सम्राट यांचा जन्म.
- १७३४ – तक्सिन, थायलंडचा राजा यांचा जन्म.
- १८८९ – अभिनेते चार्ली चाप्लीन यांचा जन्म.
- १९१८ – अभिनेत्री ललिता पवार यांचा जन्म.
- १९७२ – मुथैय्या मुरलीधरन, श्रीलंकेचा क्रिकेटपटूचा जन्म.
- १९७४ – व्हिक्टोरिया बेकहाम, इंग्लिश गायिकाचा जन्म.

### निधन

- १०८० – हॅराल्ड तिसरा, डेन्मार्कचा राजाचे निधन.
- १७११ – जोसेफ पहिला, पवित्र रोमन सम्राटाचे निधन.
- १८८५ – वनस्पतीशास्त्रज्ञ सखाराम अर्जुन राऊत यांचे निधन.
- १८९१ – अलेक्झांडर मॅकेन्झी, कॅनडाचा पंतप्रधानाचे निधन.
- १९३६ – चार्ल्स रुईस डि बीरेनब्रुक, नेदरलँडचा पंतप्रधानाचे निधन.
- १९४४ – जे.टी. हर्न, इंग्लिश क्रिकेटपटूचे निधन.

## : SMS :

bahot yaad ata
hai wo
ajnabi
jo
kabhi apna
howa
karta tha.

## हवामानाचा अंदाज

| | | |
|---|---|---|
| औरंगाबाद | ३७.७ | २५.७ |
| अहमदनगर | ३७.५ | २४.१ |
| अकोला | ४०.१ | २५.२ |
| अमरावती | ३९ | २५.७ |
| बीड | ४४.१ | २८ |
| भंडारा | ४४.१ | २६.४ |
| बुलढाणा | ३५.२ | १८.६ |
| चंद्रपूर | ४४.७ | ३१.५ |
| चेन्नई | ४१.७ | २७.३ |
| नवी दिल्ली | ३५.१ | २१ |
| धुळे | ३८.६ | २३.८ |
| गोंदिया | ४२.२ | २६.५ |
| जळगाव | ३९.८ | २३.९ |
| कोल्हापूर | ३८.३ | २१ |
| लातूर | ३७.९ | २५.५ |
| मुंबई | ४०.२ | ३०.९ |
| नागपूर | ४०.३ | २५.४ |
| नांदेड | ४०.४ | २६ |
| नंदूरबार | ३६.२ | २४.४ |
| नाशिक | ३७ | २१.३ |
| पुणे | ३६.३ | २०.९ |
| पंढरपूर | ४०.४ | २६.३ |
| सातारा | ३८.२ | १९.६ |
| सांगली | ४०.१ | २३.५ |
| सोलापूर | ४०.४ | २७.४ |
| वर्धा | ४१.५ | २४.८ |

## आजचे राशिभविष्य

**मेष :** शुभ रंग:पांढरा, शुभ दिशा: दक्षिण चांगल्या कामासाठी आज आपला पैसा खर्च होईल.

**वृषभ :** शुभ रंग : निळा, अनुकूल दिशा : उत्तर व्यावहारिक संबंधा मुळे फायदा होईल. सहचरणी सोबत वाद घालू नका.

**मिथुन :** शुभ रंग: पिवळा, शुभ दिशा:पूर्व कौटूंबिक असहकार्यामुळे मन नाराज होऊ शकते. व्यापारात अडचणी येतील. कामात मन लागणार नाही.

**कर्क :** शुभ रंग: काळा, अनुकूल दिशा : उत्तर आत्मविश्वास असल्या कारणाने कोणत्याही कामात यश मिळण्याची शक्यता आहे.

**सिंह :** शुभ रंग : जांभळा, अनुकूल दिशा : पूर्व नोकरीत आपले महत्व तसेच प्रभाव वाढेल. वास्तविकतेला महत्व देणे गरजेचे आहे.

**कन्या :** शुभ रंग : लाल, अनुकूल दिशा : पूर्व आत्मविश्वास वाढीस लागल्याने अवघड समस्याही सहज पूर्ण होतील.

**तुळ :** शुभ रंग : हिरवा, अनुकूल दिशा : पूर्व सहकाऱ्यांवर आज विश्वास ठेवू नका.

**वृश्चिक :** शुभ रंग: केसरी, शुभ दिशा: दक्षिण घरासंबंधी असलेली समस्या दूर होईल. महत्वाचे काम आज पार पडेल.


**धनु :** शुभ रंग:गुलाबी, शुभ दिशा: पूर्व नवीन व्यापारात प्रगती होण्याचे संकेत मिळतील. बोलण्यावर नियंत्रण राखा. घरातील सदस्यांची प्रगती होईल.

**मकर :** शुभ रंग: हिरवा, शुभ दिशा:उत्तर व्यापारीक स्पर्धेत विजयी होण्याचे योग आहे. घरासंबंधात समस्या राहू शकते.

**कुंभ :** शुभ रंग: निळा, शुभ दिशा: दक्षिण प्रवासात आपल्या वस्तू संभाळा. कोर्ट कचेरीच्या कामात आपल्याला यश मिळेल. कौटुंबिक संबंधात मधुरता येईल.

**मीन :** शुभ रंग: पांढरा, अनुकूल दिशा : पूर्व शुभ दिवसाचा चांगला उपयोग करून घ्या. व्यापारातील स्थिती चांगली राहील. जबाबदारीचे काम आज शक्यतो टाळावेत.

## 'दै. संध्या' जम्बो शब्दकोडे क्र. १२०



### आडवे शब्द

२. शेवट, मावळणे
३. अकबराशी शर्थीने लढणारा शूर राजपूत
७. ताठा
८. प्रतिबंध
१०. समेट
११. झेप
१२. व्यवस्थित
१६. शपथ
१७. आकाश
१९. दासी
२०. स्वयंपाकाची कला
२१. दहशत
२३. दारुमुळे निकामी होणारा अवयव
२४. जिन्नस
२५. राजाची पत्नी
२६. त्वरित
२८. वर्ष
३०. हत्ती
३२. सूर्य
३४. भारताच्या दक्षिणेचा समुद्र
३८. वाटाड्या
४०. ओळ
४१. लहान
४२. पाणी
४३. पाणी
४३. समानता
४५. जास्त किमतीचे
४६. व्यापारी
४७. एक कडसर पालेभाजी
४९. मुलाची पत्नी
५०. अपशकुन
५२. पालखी
५३. अश्व
५४. पोहणे
५६. डोके
५७. बूड
५८. रावणाची मुखे
५९. हस्त
६०. पाश्चात्त्य स्नानपात्र
६१. मार्ग
६२. अपराध्याच्या वतीने घातलेली भीड
६४. छोटा
६६. स्त्री
६८. परिणय
६९. घट्ट
७०. नस
७१. झोप
७३. वात्सल्य
७४. आजार
७६. मिठी
७९. आईची बहीण
८२. पुष्कळ (ग्रामीण)
८४. बंगाली मिठाई प्रकार
८७. रुची, पसंती
८८. विपुल
८९. सरशी

### उभे शब्द

१. आटोपशीर आकारचे
२. भूमी
४. रूढी
५. अंगिकार, स्वीकार
६. वनराज
७. नोकर
९. पुष्कळ
११. जमीन व पाणी यापैकी कोठेही राहू शकणारा सजीव
१३. पत्र
१४. सूतकताईचे साधन
१५. मिश्रण, खिचडी
१६. थालिपीठ वा चकलीचे पीठ
१८. पूर्वज
२२. शक्ती
२४. अपमान
२५. राजाची आई
२७. गांधीजींचे एक तत्त्व
२८. सारखा
२९. तल्लीन
३१. सुखी माणसाचे वस्त्र
३३. वीर स्त्री
३५. केविलवाणा
३६. कुत्रा (सं.)
३७. आवड
३९. दुर्दैव
४४. प्रासाद
४८. पुन्हा
५१. ताजेपणा
५२. कृपा
५३. स्वयंपाकात तसेच सौंदर्य प्रसाधनातही वापरला जाणारा पिवळे चूर्ण
५४. प्रखर, ५५. तृष्णा
५७. झाकीर हुसेन यांचे वाद्य, ६०. टिंगल
६३. सहजी
६५. नुकसानकारक
६६. मराठी माणसाची प्रिय करमणूक
६७. शांतता, ७२. झुंड
७३. मक्षिका, ७५. ताकद
७७. आशीर्वाद
७८. वन, बाग
८०. पारंब्या असलेले झाड
८१. आदर
८३. शाहिराचे वाद्य
८५. सांप्रत
८६. ध्येय

### जम्बो शब्दकोडे क्र. ११९ चे उत्तर

आडवे उत्तर : ३.सखी ७.गाव ९.अंदाजपत्रक १०.खळबळजनक १३.वारस १४.डावा १५.हारजीत १७.गवत १९.मार २०.खडा २१.धनी २२.नूतन २३.नस २४.तलाव २५.मानव २७.तीन २८.रसभंग ३०.जळ ३१.लड ३३.सडा ३४.साफ ३५.खडतर ३६.हाव ३८.दासी ३९.साल ४०.हवस ४३.नवरी ४५.राख ४६.अटन ४८.डरपोक ५१.कबरस्तान ५२.नवरा ५४.कव ५५.गर्वाचे घर ५६.लत ५८.नवल ६०.वर्धमान ६३.गरिमा ६५.यथा ६७.बाहेरखाली ६८.तगडा ६९.काळीज ७१.खबर ७२.समा ७३.नरम ाई ७४.कृतक ७७.चाक ७८.नेता ७९.वीतराग ८०.ब्र ८१.सरकी ८२.गणेश

उभे उत्तर : १.सदाशिव २.कापड ३.सकवार ४.जाळ ५.हळवा ६.मानहानी ८.वरात १०.खसखस ११.बडा १२.कर १६.जीवनसत्त्व १७.गवती चहा १८.तनू १९.मानस २१.धवल २२अ.तरफदारी २३.नग २४.तळतळाट २६.वडा २९.भंग ३०.जड ३२.डराव डराव ३५.खल ३७.वन ३९.साखर ४१.सर ४२.चाकवत ४४.वरचेवर ४५.राब ४६.अनल ४७.नन ४९.पोक ५०.लंगडा बाळकृष्ण ५१.करवली ५३.वनमाळी ५७.तग ५९.लय ६१.मातबरी ६२.नगर ६४.रिकामा ६६.थाप मारणे ६७अ.ख्याती ७०.जनता ७२.सकस ७५.कवी ७६.सुरा ७८.नेकी

RNI No. 1663/1957 (DAILY SANDHYA) |
दैनिक संध्या पब्लिकेशन्स प्रा. लि. यांच्या मालकीचे हे दैनिक मुद्रक व प्रकाशक ज्योती नाळे यांनी सामना प्रेस (प्रबोधन प्रकाशन) सिंहगड रोड, वडगांव खुर्द पुणे–४११०४१ येथे छापून, १०३८ आकार भवन, दुसरा मजला, टिळक रोड, पुणे – ४११००२ येथे प्रसिद्ध केले.
संपादिका : ज्योती नाळे (पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी.) (फोन : ०२०–२४४७९२९२)
Daily "Sandhya" News paper is owned by Dainik Sandhya Publications Pvt. Ltd. Printed & Published by Jyoti Nale, Printed at Saamana Press (Prabodhan Prakashan) Pvt. Ltd. Sihagad Road, Vadgaon Khurd, Pune 411 041, published at 1038, Aakar Bhavan, Tilak Road, Pune 411002. Editor - Jyoti Nale.

## थोडक्यात पण महत्वाचे...



### पुणे शहर जिल्हा काँग्रेस कमिटीच्या वतीने विनम्र अभिवानदन

पुणे (दैनिक संध्या) : भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंती निमित्त पुणे शहर जिल्हा काँग्रेस कमिटीच्या वतीने आज कलेक्टर कचेरी जवळील डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यास व काँग्रेस भवन येथे शहराध्यक्ष अरविंद शिंदे यांच्या हस्ते त्यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून विनम्र अभिवादन करण्यात आले. यावेळी अरविंद शिंदे म्हणाले की, "डॉ. आंबेडकरांचा हा दिमाखदार जीवन प्रवास, त्यांच्या अभ्यासू आणि कृतिशील व्यक्तिमत्त्वाचे दर्शन घडवतो. सर्वात प्रथम, त्यांनी अर्थशास्त्र, राजकारण, कायदा, तत्वज्ञान आणि समाजशास्त्र या विषयांचे उत्तम ज्ञान संपादन केले. शिक्षण घेताना त्यांना अनेक सामाजिक समस्यांना तोंड द्यावे लागले. पण त्यांनी आपले आयुष्य केवळ वाचन-अभ्यास आणि ग्रंथालयात व्यतीत केले नाही. त्यांनी आकर्षक पगाराची उच्च पदे नाकारली, कारण ते शोषित वर्गातील आपल्या बधुंना विसरले नाहीत. त्यांनी आपले उर्वरित आयुष्य समता, बंधुता आणि मानवतेसाठी समर्पित केले. पिचलेल्या वर्गाच्या उन्नतीसाठी त्यांनी सर्वतोपरी प्रयत्न केले. त्यांचा जीवन इतिहास पाहिल्यावर, त्यांचे मुख्य योगदान आणि त्यांची प्रासंगिकता अभ्यासणे आणि त्याचे विश्लेषण करणे आवश्यक आणि योग्य आहे. एका मतप्रवाहानुसार तीन मुद्दे आजही अधिक महत्त्वाचे आहेत. भारतीय अर्थव्यवस्था आणि भारतीय समाज आजही अनेक आर्थिक, सामाजिक समस्यांना तोंड देत आहे. या समस्या सोडवण्यामध्ये, डॉ. आंबेडकरांचे विचार आणि कृती आपल्यासाठी मार्गदर्शक ठरतील. यावेळी नगरसेवक ॲड. अविनाश साळवे, रफिक शेख, मेहबुब नदाफ, प्राची दुधाने, ॲन्थोनी जेकब, राज अंबिके, फिरोज शेख, अभिजीत महामुनी, सिमा सावंत, सुंदर ओव्हाळ, विशाल जाधव, अकबर शेख सुरेश नांगरे, फैय्याज शेख, मनोहर गाडेकर, नितीन वायदंडे, मुन्ना खंडेलवाल, विनोद चौरे आदी उपस्थित होते.



### 'दगडूशेठ' गणपती ट्रस्टतर्फे 400 ज्येष्ठांना मोफत श्रवणयंत्र

पुणे (दैनिक संध्या) : श्रीमंत दगडूशेठ हलवाई सार्वजनिक गणपती ट्रस्ट, सुवर्णयुग तरुण मंडळातर्फे आणि ॲलिम्को कंपनी यांच्या संयुक्त विद्यमाने सदाशिव पेठेतील फडके हॉल येथे झालेल्या कार्यक्रमात महाराष्ट्रातील तब्बल ४०० ज्येष्ठांना श्रवणयंत्र मोल्ड चे वाटप करण्यात आले. महाराष्ट्राच्या विविध शहरांतून तसेच ग्रामीण भागातून हे ज्येष्ठ नागरिक शिबीरासाठी पुण्यात आले होते. यावेळी श्रीमंत दगडूशेठ हलवाई सार्वजनिक गणपती ट्रस्टचे अध्यक्ष सुनील रासने, कोषाध्यक्ष महेश सूर्यवंशी, सरचिटणीस व आमदार हेमंत रासने, सहचिटणीस अमोल केदारी, उत्सव प्रमुख अक्षय गोडसे, सुवर्णयुग तरुण मंडळाचे अध्यक्ष प्रकाश चव्हाण यांसह पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते. सुनील रासने म्हणाले, दगडूशेठ गणपती ट्रस्ट व विविध संस्था, कंपन्या यांच्या संयुक्त विद्यमाने या शिबीरांचे आयोजन करण्यात येत आहे. केवळ पुण्यातच नाही, तर इतरही शहरातून या उपक्रमाला मोठा प्रतिसाद मिळत आहे. यावरुनच समाजातील मोठी व्यथा समोर येत असल्याचे दिसून आले आहे. आजच्या कार्यक्रमात ४०० रुग्णांना यंत्र देण्यात आले. ते पुढे म्हणाले, कानाच्या विकारांप्रमाणेच विविध आजार, कृत्रिम अवयव यांसह सर्व प्रकारची वैद्यकीय मदत ट्रस्टच्या माध्यमातून सातत्याने केली जात आहे. जय गणेश रुग्णसेवा अभिनायाच्या माध्यमातून लाखो गरजू रुग्णांना लाभ होत असून समाजाच्या तळागाळात पोहोचण्याचा ट्रस्टचा प्रयत्न असल्याचे त्यांनी सांगितले.



### बहुराष्ट्रीय कंपन्यांमधील 'कॉर्पोरेट जिहाद' व धर्मांतराचे षडयंत्र रोखा!

पुणे (दैनिक संध्या) : नाशिक येथील एका बहुराष्ट्रीय कंपनीत हिंदू महिला कर्मचाऱ्यांचे लैंगिक शोषण, धर्मांतरासाठी दबाव, गोमांस भक्षणाची सक्ती आणि नमाज पठणाचे जे धक्कादायक प्रकार उघडकीस आले आहेत, त्यामागील विखारी जिहादी मानसिकता आणि संघटित गुन्हेगारी मोडीत काढावी, अशी मागणी हिंदु जनजागृती समितीने केली आहे. हे केवळ नाशिकपुरते मर्यादित नसून मुंबईसह देशातील इतर शाखांमध्ये पसरलेले मोठे 'कॉर्पोरेट जिहाद' असू शकते. यामागील 'लव्ह जिहाद', 'धार्मिक दहशत' आणि 'धर्मांतर रॅकेट'चा सखोल तपास करून यातील देशव्यापी साखळी उघड करावी, अन्यथा समिती जनआंदोलन छेडेल, असा इशारा समितीने एका निवेदनाच्या माध्यमांतून नाशिकचे पोलीस आयुक्त यांच्यासह निफाड, येवला, पिंपळगाव बसवंत या ठिकाणी जिल्हा आणि पोलीस प्रशासनाला देण्यात आला आहे. यात अनेक ठिकाणी समितीच्या रणरागिणी या महिला शाखेतील युवती व महिलांची सहभाग लक्षणीय होता. सदर कंपनीत ७ आरोपींना अटक झाली आहे. नाशिकमध्ये ७ सापडले, तर अन्य शहरात किती असतील ? हे केवळ नाशिकपुरते मर्यादित नसून मुंबईसह देशातील इतर शाखांमध्ये पसरलेले मोठे 'कॉर्पोरेट षड्यंत्र' असू शकते. यामागील 'लव्ह जिहाद' आणि 'धर्मांतर रॅकेट'चा सखोल तपास करून यातील व्यापक तपास होण्याची आवश्यकता आहे. ज्या कंपन्यांमध्ये हिंदू महिलांच्या अब्रूचे रक्षण होत नाही आणि जिथे 'धार्मिक दहशत' निर्माण केली जाते, अशा कंपन्यांचा व्यवसाय परवाना रद्द करून त्यांना टाळे ठोकण्यात यावे; तसेच राज्यातील सर्व आयटी आणि बहुराष्ट्रीय कंपन्यांचे तात्काळ 'विशेष सुरक्षा आणि धार्मिक भेदभावविरोधी ऑडिट' करण्याचे आदेश सरकारने द्यावेत. श्रीरामांच्या पदस्पर्शाने पावन झालेल्या नाशिकच्या भूमीत जर 'कॉर्पोरेट'च्या नावाखाली हिंदू महिलांची अब्रू लुटली जात असेल, तर हिंदू समाज शांत बसणार नाही. जर प्रशासनाने या नराधमांवर आणि त्यांना पाठीशी घालणाऱ्या व्यवस्थेवर त्वरित कठोर कारवाई केली नाही, तर हिंदु जनजागृती समिती समस्त हिंदू संघटनांच्या वतीने तीव्र जनआंदोलन छेडेल, असा इशारा समितीने या प्रसिद्धीपत्रकाद्वारे दिला आहे.

# 'निवडणूकजीवी' राजकारणामुळे देशाचे नुकसान

**सीमांकन घटनात्मक पद्धतीनेच व्हावे – काँग्रेसची प्रखर टीका : महिला आरक्षण, जातीय जनगणना आणि मतदारसंघ पुनर्रचनेवर केंद्र सरकारवर निशाणा**

**पुणे (दै. संध्या)**

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीच्या पार्श्वभूमीवर केंद्र सरकारच्या धोरणांवर महाराष्ट्र प्रदेश काँग्रेसने जोरदार टीका केली आहे. 'निवडणूकजीवी व सत्ताभिलाषी राजकारणा'मुळे देशाच्या लोकशाही व्यवस्थेला धक्का बसत असून, मतदारसंघांचे सीमांकन (Delimitation) घटनात्मक परंपरेनुसारच व्हावे, अशी ठाम भूमिका काँग्रेसने मांडली आहे.




महाराष्ट्र प्रदेश काँग्रेसचे वरिष्ठ प्रवक्ते गोपाळदादा तिवारी यांनी पत्रकार परिषदेत बोलताना 'नारी शक्ती वंदन' विधेयकासह केंद्राच्या विविध निर्णयांवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले. ते म्हणाले की, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी अपेक्षित केलेली सामाजिक समता व मागासवर्गीय महिलांचे प्रतिनिधित्व याकडे दुर्लक्ष करून केंद्र सरकारने महिला आरक्षणाचा विषय केवळ राजकीय फायद्यासाठी वापरला आहे. तिवारी म्हणाले की, पश्चिम बंगाल व तामिळनाडूतील निवडणुका डोळ्यासमोर ठेवून महिला मतदारांची सहानुभूती मिळवण्यासाठी केंद्र सरकारकडून घाईगडबडीत विधेयकांमध्ये बदल केले जात आहेत. "एकाच महिला आरक्षण विधेयकात पुन्हा बदल करून 'महिलांसाठी काम करत आहोत' असे दाखवण्याचा प्रयत्न हा निवडणूकजीवी राजकारणाचा भाग आहे," असा आरोप त्यांनी केला. २०२३ मध्ये संसदेत मंजूर झालेल्या 'नारी शक्ती वंदन' विधेयकानुसार लोकसभा व विधानसभांमध्ये ३३ टक्के महिला आरक्षण हे २०२९ नंतर आणि मतदारसंघांच्या पुनर्रचनेनंतर लागू होणार आहे. मात्र, यामध्ये वारंवार बदल करण्याचा प्रयत्न होत असल्याचा आरोप काँग्रेसने केला आहे.

"संविधानिक संकेत धुडकावून महिला आरक्षणाचा केवळ राजकीय फायदा घेतला जात आहे," असे तिवारी म्हणाले. महिला आरक्षणाच्या अंमलबजावणीत अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती व इतर मागासवर्गीय (OBC) घटकांना स्वतंत्र आरक्षण देणे आवश्यक असल्याचे काँग्रेसने स्पष्ट केले. यासाठी जातीनिहाय जनगणना आवश्यक असून, ती टाळण्याचा प्रयत्न केंद्र सरकार करत असल्याचा आरोपही करण्यात आला.

"बिहार व तेलंगणाने सहा महिन्यांत जातीय जनगणना पूर्ण केली, मग केंद्र सरकार का विलंब करत आहे?" असा सवाल तिवारी यांनी उपस्थित केला.

लोकसभा व विधानसभा मतदारसंघांच्या पुनर्रचनेबाबत काँग्रेसने स्पष्ट भूमिका मांडली. "ही प्रक्रिया केवळ अंकगणितावर आधारित नसून राजकीयदृष्ट्या न्याय्य असावी. दक्षिणेकडील राज्यांनी लोकसंख्या नियंत्रण व साक्षरतेत चांगले काम केले आहे. त्यामुळे त्यांचे प्रतिनिधित्व कमी होऊ नये," अशी भूमिका काँग्रेस नेत्या सोनिया गांधी यांनी मांडल्याचे तिवारी यांनी सांगितले.

#### महिला आरक्षणाचा इतिहास

महिला आरक्षणाबाबत काँग्रेसची भूमिका सातत्यपूर्ण राहिल्याचे सांगताना तिवारी यांनी इतिहासाची आठवण करून दिली. १९९६ मध्ये एच. डी. देवेगौडा यांच्या सरकारच्या काळात महिला आरक्षण विधेयक प्रथम मांडण्यात आले होते. त्यानंतर ९ मार्च २०१० रोजी डॉ. मनमोहन सिंग सरकारच्या काळात राज्यसभेत मोठ्या गदारोळात हे विधेयक मंजूर करण्यात आले होते. तसेच, स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये ३३ टक्के महिला आरक्षण देऊन महिलांच्या राजकीय सहभागाची पायाभरणी माजी पंतप्रधान राजीव गांधी यांनी केली, असा दावा काँग्रेसने केला.

#### 'नैसर्गिक न्याय' आवश्यक

तिवारी म्हणाले की, २०२१ ची लांबणीवर पडलेली जनगणना पूर्ण करून, त्यावर आधारित सीमांकन प्रक्रिया झाल्यानंतरच महिला आरक्षण लागू करणे हा 'नैसर्गिक न्याय' ठरेल. अन्यथा ही प्रक्रिया अपुरी व अन्यायकारक ठरेल.

> एकंदरीत, महिला आरक्षण, जातीय जनगणना आणि मतदारसंघ पुनर्रचना या सर्व मुद्द्यांवर केंद्र सरकारवर काँग्रेसने तीव्र टीका करत, घटनात्मक परंपरा आणि सामाजिक न्याय यांना प्राधान्य देण्याची मागणी केली आहे.

## चंद्रकांत पाटील यांचा विरोधकांवर खोचक टोला

**पुणे (दै. संध्या)**

बारामती विधानसभा पोट निवडणुकीत उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांच्या विरोधात जे उभे आहेत त्यांचे पत्ते शोधून काढणाऱ्याला मी एक कॅडबरी देईन, असा चिमटा काढत राज्याचे उच्च व तंत्रशिक्षणमंत्री चंद्रकांत पाटील यांनी बारामती पोटनिवडणुकीच्या पार्श्वभूमीवर विरोधकांवर हल्लाबोल केला. महायुती व राष्ट्रवादी काँग्रेसच्या उमेदवार सुनेत्रा पवार यांच्या प्रचारार्थ वडगाव निंबाळकर (ता. बारामती) येथे जाहीर सभेत बोलताना पाटील यांनी मतदारांना विक्रमी मतदानाचे आवाहन केले. निवडणुकीला उभे असलेल्या विरोधकांवर टीका करताना पाटील म्हणाले, "निवडणुकीला उभे असलेले उमेदवार हे मतदारसंघाबाहेरील आहेत. बाहेरचे उमेदवार येथे का उभे राहिले? मतदानाला उभे राहण्याचा त्यांचा हेतू काय, याचा जाब विचारण्याची वेळ आली आहे." निवडणूक एकतर्फी असली तरी मतदानाचे विक्रम प्रस्थापित होणे गरजेचे आहे. सुनेत्राताई पवार यांचा विजय हा केवळ निकालापुरता मर्यादित न राहता लोकांच्या मनात ठामपणे नोंदला जावा, असे सांगत त्यांनी कार्यकर्त्यांना जोमाने काम करण्याचे निर्देश दिले. केंद्र व राज्य सरकारच्या जनकल्याणकारी योजनांची माहिती घरोघरी पोहोचवण्याचे आवाहन करत पाटील म्हणाले, 'शेतकऱ्यांसाठी, महिलांसाठी, विद्यार्थिनींसाठी राबवलेल्या योजना सर्वांना लाभ देत आहेत.

## 'नारी शक्ती वंदन' अभियानातून महिलांच्या सक्षमीकरणाला नवी दिशा

*राज्यसभा खासदार प्रा. डॉ. मेधा कुलकर्णी यांची माहिती; १५-१६ एप्रिलला देशभर पदयात्रा व विविध उपक्रम*

**पुणे (दै. संध्या)**

महिलांच्या राजकीय सक्षमीकरणासाठी केंद्र सरकारने आणलेल्या 'नारी शक्ती वंदन अधिनियम'च्या पार्श्वभूमीवर भाजपातर्फे देशव्यापी जनसंपर्क अभियान राबविण्यात येणार आहे. या अभियानामुळे महिला सक्षमीकरणाला नवी दिशा मिळणार असून, राजकारणातील महिलांचे प्रतिनिधित्व वाढण्यास मदत होणार असल्याची माहिती राज्यसभा खासदार प्रा. डॉ. मेधा कुलकर्णी यांनी पत्रकार परिषदेत दिली. या अभियानांतर्गत १५ आणि १६ एप्रिल रोजी प्रत्येक लोकसभा मतदारसंघात पदयात्रा, संवाद उपक्रम, महिला मेळावे आदी कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येणार असल्याचेही त्यांनी नमूद केले. प्रसंगी नगरसेविका प्रा.




डॉ. निवेदिता एकबोटे, प्रियांका शेंडगे-शिंदे व मनीषा लडकत उपस्थित होत्या. प्रा. डॉ. मेधा कुलकर्णी म्हणाल्या, "सप्टेंबर २०२३ मध्ये संसदेत मंजूर झालेला 'नारी शक्ती वंदन अधिनियम' हा लोकसभा, राज्य विधानसभा आणि दिल्ली विधानसभेत महिलांसाठी ३३ टक्के आरक्षण देणारा ऐतिहासिक घटनादुरुस्ती कायदा आहे. या कायद्यात अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमातींच्या जागांमध्येही महिलांसाठी आरक्षणाचा समावेश करण्यात आला आहे. त्यामुळे महिलांचे केवळ मतदानापुरते मर्यादित न राहता धोरणनिर्मितीमध्येही सक्रिय प्रतिनिधित्व वाढेल. जागतिक स्तरावरील संशोधनानुसार महिलांचा आर्थिक व सामाजिक क्षेत्रातील सहभाग वाढल्यास देशाच्या अर्थव्यवस्थेलाही मोठी चालना मिळते. भारतात गेल्या दशकात महिलांच्या सक्षमीकरणासाठी अनेक योजना प्रभावीपणे राबविण्यात आल्या आहेत. उज्ज्वला योजनेमुळे स्वयंपाकासाठी स्वच्छ इंधन उपलब्ध झाले, जलजीवन मिशनमुळे घराघरात पाणीपुरवठा पोहोचला, तर स्वच्छ भारत अभियानामुळे महिलांच्या आरोग्य व सन्मानात वाढ झाली. मुद्रा व जनधन योजनांमुळे महिलांच्या आर्थिक सक्षमीकरणाला बळ मिळाले असून, मोठ्या प्रमाणावर महिला उद्योजक पुढे येत आहेत." राजकीय सहभागाबाबत बोलताना त्यांनी सांगितले, की आज महिलांचा मतदानातील सहभाग लक्षणीय वाढला आहे.

## मराठी उद्योजकाचा अमेरिकेच्या हार्वर्डमध्ये झेंडा

'तौराल इंडिया' व भरत गीते यांची यशोगाथा हार्वर्ड बिझनेस स्कुलच्या अभ्यासक्रमात

**पुणे (दै. संध्या)**

ॲल्युमिनियम सँड कास्टिंग क्षेत्रातील आघाडीची कंपनी तौराल इंडिया आणि उद्योगांना ग्रामीण भारताशी जोडू पाहणारे उद्योजक, 'ॲल्युमिनियम मॅन ऑफ इंडिया' अशी ओळख असलेले भरत गीते यांची यशोगाथा जगातील प्रतिष्ठित शैक्षणिक संस्थांपैकी एक असलेल्या अमेरिकेतील हार्वर्ड बिझनेस स्कूलच्या केस स्टडीमधून मांडण्यात आली आहे. या माध्यमातून तौराल इंडिया जागतिक स्तरावर अभ्यासल्या जाणाऱ्या निवडक कंपन्यांच्या यादीत स्थान मिळवणारी कंपनी ठरली आहे. ही केस स्टडी तौरल इंडियाचे संस्थापक व मुख्य कार्यकारी अधिकारी भरत गीते यांच्या नेतृत्वाखाली उभारलेल्या उच्च-प्रिसिजन ॲल्युमिनियम



कास्टिंग व्यवसायाच्या प्रवासावर आधारित आहे. जर्मनीस्थित थोनी आलुटेक या कंपनीसोबतच्या संयुक्त उपक्रमातून २०१६ साली सुरू झालेल्या या प्रवासाचा मागोवा या अभ्यासात घेण्यात आला आहे. ऊर्जा, रेल्वे, संरक्षण आणि एरोस्पेस यांसारख्या महत्त्वाच्या क्षेत्रांना सेवा देणाऱ्या जागतिक स्तरावरील उत्पादन व्यासपीठापर्यंत झालेल्या कंपनीच्या प्रगतीचा यात समावेश आहे. हार्वर्ड बिझनेस स्कुल येथील वरिष्ठ प्राध्यापक व्ही. जी. नारायणन यांनी ही केस स्टडी तयार केली असून, मुंबईतील हॉटेल ताज लँड्स एन्ड येथे मंगळवारी त्यांनी या केस स्टडीचे सादरीकरण केले. भरत गीते व माजी उद्योगमंत्री सुभाष देसाई यांच्यासह उद्योग, शिक्षण व धोरणात्मक क्षेत्रातील मान्यवर यावेळी उपस्थित होते. परंपरागत औद्योगिक पार्श्वभूमी किंवा नेटवर्क नसतानाही पहिल्या पिढीतील उद्योजक जागतिक स्तरावरील उद्योग कसा उभारू शकतात, याबाबतचे विश्लेषण प्रा. व्ही. जी. नारायणन यांनी यामधून मांडले आहे. प्रा. व्ही. जी. नारायणन म्हणाले, "तौरल इंडियाचा प्रवास उदयोन्मुख बाजारपेठेत उत्पादन क्षमता उभारण्यासाठी आवश्यक असलेल्या घटकांवर केंद्रित आहे. जागतिक सहकार्य, उच्च तंत्रज्ञान आणि स्थानिक अंमलबजावणी यांच्या संगमातून सक्षम व जागतिक स्तरावर स्पर्धात्मक उद्योग कसा उभा राहू शकतो, याचे हे उदाहरण आहे. 'तौराल इंडिया'चा प्रवास केवळ उद्योगक्षेत्रापुरता मर्यादित न राहता, नव्या पिढीतील उद्योजकांसाठी प्रेरणादायी ठरेल. त्यातूनही एखादा तरुण उद्योजक झाला, तर या केस स्टडीचा उद्देश साध्य झाल्याचे समाधान मिळेल."

## पेट्रोल ओतून स्वतःला पेटवून दिले; गंभीर जखमी होऊन मृत्यू

**सासरच्या छळामुळे महिलेने उचलले टोकाचे पाऊल**

**पुणे (दै. संध्या)**

छळामुळे एका महिलेने अंगावर पेट्रोल ओतून आत्महत्या केल्याची घटना कात्रज भागात घडली. या प्रकरणी भारती विद्यापीठ पोलिसांनी सासऱ्यासह दिराविरोधात गुन्हा दाखल केला. याबाबत महिलेच्या बहिणीने भारती विद्यापीठ पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे. फिर्यादीनुसार, सासरे हनुमंत काळे आणि दीर रतन (रा. वंडरसिटी सोसायटीजवळील झोपडपट्टी, कात्रज) यांच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, आरोपी सासरे आणि दीर महिलेचा छळ करत होते. लाकडे फोडण्याच्या कारणावरून तिला शिवीगाळ करण्यात आली होती. दि. ११ एप्रिल रोजी रात्री साडेआठच्या सुमारास अंगावर बाटलीत भरलेले पेट्रोल ओतले. पेट्रोल ओतून पेटवून घेतले. गंभीररीत्या भाजलेल्या महिलेला तातडीने रुग्णालयात दाखल करण्यात आले. उपचारादरम्यान तिचा मृत्यू झाला. या घटनेनंतर तिच्या बहिणीने मंगळवारी (दि. १४) पोलिसांकडे तक्रार दिली. सासरे आणि दिराच्या छळामुळे आत्महत्या केल्याचे फिर्यादीत म्हटले आहे. तपास सहायक पोलिस निरीक्षक गणेश मोहिते करत आहेत.

# पुणे जिल्ह्यात ३८६१ रुग्णांना सुमारे ३४ कोटी ५३ लाखांची मदत

**मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या दूरदृष्टीतून आरोग्यसेवेला गती**

**पुणे (दै. संध्या)**

शासनाच्या आरोग्यविषयक विविध योजनांमधून मदत न मिळालेल्या पात्र व गरजू रुग्णांसाठी मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता निधी 'आधार' ठरत आहे. पुणे जिल्ह्यात आर्थिक वर्षात ३,८६१ रुग्णांना सुमारे ३४ कोटी ५३ लाख रुपयांची वैद्यकीय आर्थिक मदत वितरित करण्यात आली आहे.

महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या दूरदृष्टीतून जिल्हा कक्षाची स्थापना, पेपरलेस अर्ज प्रक्रिया, तातडीने अर्जाचा निपटारा करणे आदी सकारात्मक बदल करण्यात आले. त्यासोबतच सामंजस्य करार, क्राउड फंडिंग आदींच्या माध्यमातून समाजातील मदत करणारे रूग्णालय, धर्मादाय रूग्णालय, संस्था, दाते आदींच्या सहकार्य लाभत आहे. मुख्यमंत्री सहाय्यता निधीच्या कार्यपद्धतीत केलेल्या सुधारणा आणि मदतीचे विविध मार्ग उपलब्ध करून दिल्याने पारदर्शकता वाढून मदत वितरणाचा वेग लक्षणीयरीत्या वाढला आहे. परिणामी, अधिकाधिक पात्र रुग्णांना वेळेत आर्थिक सहाय्य मिळत आहे. कॉक्लियर इम्प्लांट (वय वर्ष २ ते ६), हृदय, यकृत, किडनी, फुफ्फुस, बोन मॅरो, हाताचे, गुडघ्याचे प्रत्यारोपण, हिप रिप्लेसमेंट, कर्करोग शस्त्रक्रिया, रस्ते अपघात, लहान बालकांची शस्त्रक्रिया, मेंदूचे आजार, हृदयरोग, डायालिसिस, कर्करोग (केमोथेरपी / रेडिएशन), अस्थिबंधन, नवजात शिशुंचे आजार, बर्न (भाजलेले) रुग्ण, विद्युत अपघात रुग्ण या अशा एकूण २० गंभीर आजारांसाठी आर्थसहाय्य दिले जाते. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या पुढाकाराने मुख्यमंत्री सहाय्यता निधी कक्ष, बीपीसीएल फाऊंडेशन व टाटा मेमोरियल सेंटर यांच्यात बालकांच्या कर्करोग उपचारासाठी नुकताच सामंजस्य करार करण्यात आला आहे. या करारामुळे सामाजिक दायित्व (सीएसआर) अंतर्गत उपचारांसाठी विशेष निधी उपलब्ध होणार आहे. आर्थिक अडचणी कमी होऊन गरजू बालकांना गुणवत्तापूर्ण कर्करोग उपचार सुलभ होणार आहेत. १ एप्रिल २०२५ ते ३१ मार्च २०२६ या कालावधीत राज्यातील तब्बल ४० हजार ७७६ रुग्णांना ३३३ कोटी ६ लाख ८१ हजार ५०० रुपयांची वैद्यकीय मदत देण्यात




आली आहे. तर, याच कालावधीत पुणे जिल्ह्यातील ३,८६१ रुग्णांना सुमारे ३४ कोटी ५३ लाख ९९ हजार रुपयांची आर्थिक मदत वितरित करण्यात आली आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या दूरदृष्टीतून साकारण्यात आलेल्या जिल्हा कक्ष, पेपरलेस अर्ज प्रक्रिया, सामंजस्य करार आदींमुळे रूग्णांना वेळेत अर्थसाहाय्य होत आहे. गरजू रूग्णांनी योजनेचा लाभ घेण्याकरिता आणि अधिक माहितीकरिता १८०० १२३ २२११ या टोल फ्री क्रमांकावर संपर्क साधावा असे आवाहन मुख्यमंत्री सहाय्यता निधी व धर्मादाय रूग्णालय मदत कक्षाचे कक्ष प्रमुख रामेश्वर नाईक यांना केले आहे.

## थोडक्यात पण महत्वाचे...




### 'बॅटलग्राउंड सीझन 2'चा झलकप्रदर्शन सोहळा; 17 एप्रिलपासून अमेझॉन एमएक्स प्लेअरवर

मुंबई (दैनिक संध्या) : शरीरसामर्थ्य, डावपेच आणि मानसिक ताकदीची कठीण परीक्षा पाहणारा लोकप्रिय स्पर्धात्मक कार्यक्रम 'बॅटलग्राउंड' नव्या रूपात प्रेक्षकांसमोर येत आहे. पहिल्या पर्वाला मिळालेल्या उत्स्फूर्त प्रतिसादानंतर आता 'बॅटलग्राउंड सीझन २ चा झलकप्रदर्शन सोहळा पार पडला असून हा कार्यक्रम १७ एप्रिल २०२६ पासून अमेझॉन एमएक्स प्लेअरवर दररोज नव्या भागांसह विनामूल्य पाहता येणार आहे. या पर्वात एकूण १६ स्पर्धक चार संघांमध्ये विभागले गेले आहेत. मुंबई स्ट्रायकर्स संघाचे नेतृत्व प्रियांका चाहर चौधरी, भोजपुरी भौकाल्सचे नेतृत्व खेसारी लाल, दिल्ली डॉमिनेटर्सचे नेतृत्व फुक्रा इन्सान, तर तेलुगू टायगर्सचे नेतृत्व कबड्डीपटू राहुल चौधरी करत आहेत. स्पर्धेचे मार्गदर्शक म्हणून क्रिकेटपटू शिखर धवन यांची भूमिका यंदाही महत्त्वाची ठरणार आहे. 'बॅटलग्राउंड हाऊस'मध्ये स्पर्धकांना शारीरिक तसेच मानसिक क्षमतेची कठीण चाचणी देणाऱ्या विविध आव्हानांचा सामना करावा लागणार आहे. दररोज होणाऱ्या कामगिरी चाचण्या आणि 'फाइट क्लब सप्ताहअंत'मधील थरारक स्पर्धांमधून अंतिम विजेत्यांची निवड होईल. अखेरीस एक पुरुष आणि एक महिला स्पर्धक 'भारताचा सर्वोत्तम तंदुरुस्ती तारा' हा किताब पटकावतील. अमेझॉन एमएक्स प्लेअरचे आशय विभाग प्रमुख अमोघ दुसाद यांनी सांगितले की, हा कार्यक्रम केवळ शरीरसामर्थ्यावर आधारित नसून चिकाटी, मानसिक धैर्य आणि जिंकण्याची जिद्द यांचा उत्सव आहे. यंदाचा पर्व अधिक व्यापक आणि अधिक तीव्रतेने सादर करण्यात आला आहे. स्पर्धेबाबत बोलताना शिखर धवन यांनी या वेळी स्पर्धेची पातळी अधिक उंचावली असून आव्हाने अधिक कठीण असल्याचे नमूद केले. प्रियांका चाहर चौधरी, खेसारी लाल, फुक्रा इन्सान आणि राहुल चौधरी यांनीही आपल्या संघासह विजेतेपदासाठी जोरदार लढत देण्याचा निर्धार व्यक्त केला. रस्क मीडिया निर्मित हा कार्यक्रम दूरध्वनी संच, दूरचित्रवाणीशी जोडलेली साधने तसेच विविध प्रसारण माध्यमांवर पाहता येणार आहे. अधिक चुरशीच्या लढती आणि रोमांचक घडामोडींनी भरलेला हा पर्व प्रेक्षकांना दररोज नवा अनुभव देणार आहे.

### सुवर्ण तारण कर्जाचा आकार झाला दुप्पट; कर्जदाराकडे सरासरी कर्ज प्रमाण 1.96 लाख रुपये

मुंबई (दैनिक संध्या) : सुवर्ण तारण कर्जाचा आकार 2022 मधील पहिल्या तिमाहीत 90 हजार रुपये होता. त्यात 2025 च्या चौथ्या तिमाहीत 1.96 लाख रुपयांपर्यंत वाढ झाली आहे. ट्रान्सयुनियन सिबिलच्या गोल्ड लोन लँडस्केप अहवालातून ही माहितीसमोर आली आहे. देशात सुवर्ण तारण कर्ज वेगाने वाढ होत असून, शिल्लक कर्ज वाट्याच्या आधारावर भारतातील दुसऱ्या क्रमांकाचे मोठे किरकोळ कर्ज उत्पादन बनले आहे. ट्रान्सयुनियन सिबिलच्या अहवालानुसार मार्च 2022 पासून सुवर्ण तारण शिल्लक 3.8 पट वाढली असून, डिसेंबर 2025 पर्यंत किरकोळ कर्जवितरणातील त्यांचा वाटा 5.9 वरून 11.1 टक्क्यांपर्यंत वाढला आहे. विशेषतः नॉन बँकिंग फायनान्स कंपन्यांची (एनबीएफसी) कामगिरी चांगली राहिली आहे. मार्च 2022 मधील 7 वरून डिसेंबर 2025 मध्ये एनबीएफसीचा एकूण कर्जातील वाटा 11 टक्क्यांपर्यंत वाढला आहे. तसेच सार्वजनिक क्षेत्रातील बँकांनी याच कालावधीत 57 वरून 62 टक्क्यांपर्यंत वाढ नोंदविली आहे. प्रत्येक खात्यावरील सरासरी सुवर्ण तारण कर्ज रकमेची शिल्लक मार्च 2022 मधील 1.1 वरून डिसेंबर 2025 मध्ये 1.9 लाख रुपयांपर्यंत वाढली आहे. सुवर्ण तारण कर्ज 2.5 लाख रुपयांपेक्षा जास्त असलेल्या कर्जदारांचे प्रमाण 2025 अखेरीस 14 टक्के झाले आहे. हेच प्रमाण 2022 मध्ये 10 टक्के होते. ट्रान्सयुनियन सिबिलचे व्यवस्थापकीय संचालक आणि मुख्य कार्यकारी अधिकारी भावेश जैन म्हणाले, भारतामध्ये सोने नेहमीच आर्थिक आणि सांस्कृतिकदृष्ट्या महत्त्वाचे राहिले आहे. मात्र, आता सुलभ आणि सुरक्षित कर्ज म्हणून सुवर्ण तारण कर्जाचे प्रमाण वाढत आहे.

### दादरला दोन घटनांत व्यावसायिकासह वृद्धाची हत्या

मुंबई (दैनिक संध्या) : दोन वेगवेगळ्या घटनांमध्ये एका वयोवृद्धासह व्यावसायिकाची बेदम मारहाण करून हत्या करण्यात आल्याची घटना दादर परिसरात उघडकीस आली आहे. हत्या झालेल्यांत अंकुश मनोहर आंबोकर आणि नरेश ऊर्फ नरोत्तम बाला वाघेला यांचा समावेश आहे. याप्रकरणी माटुंगा आणि दादर पोलिसांनी दोन स्वतंत्र हत्येच्या गुन्ह्यांची नोंद केली आहे. पहिल्या गुन्ह्यातील आठ जणांना दादर पोलिसांनी अटक केली असून दुसऱ्या गुन्ह्यातील दोघांचा पोलिसांकडून शोध सुरू आहे. पहिली घटना रविवारी रात्री साडेनऊ वाजता दादर येथील डॉ. येलमार हॉस्पिटलसमोर घडली. बँजोचा व्यावसाय असलेल्या अंकुश आंबोकरचा गौरव नथू सनस याच्याशी व्यावसायिक वाद होता. रविवारी रात्री अंकुश हा दादर येथे आला होता. यावेळी तिथे गौरवसह दहा जणांनी त्याच्याशी जुन्या वादातून भांडण सुरू केले होते. यावेळी अंकुशला लाथाबुक्क्यांनी बेदम मारहाण केली. त्यात तो गंभीररीत्या जखमी होऊन बेशुद्ध झाला होता. केईएम रुग्णालयात त्याला डॉक्टरांनी मृत घोषित केले. याप्रकरणी दहाही आरोपींविरुद्ध हत्येचा गुन्हा दाखल केला असून आठ आरोपींना पोलिसांनी अटक केली. दोघांचा शोध सुरू आहे.

### मुंबईचे ड्रग्ज कनेक्शन कल्याणला भिडले

मुंबई (दैनिक संध्या) : मुंबईच्या गोरेगाव येथील मेस्को सेंटरमध्ये झालेल्या पार्टीत ड्रग्जचा पुरवठा करणारा पेडलर आनंद पटेल याला कल्याणमधून अटक करण्यात आली आहे. खडकपाडा पोलिसांच्या मदतीने मुंबई पोलिसांनी आनंदला त्याच्या घरातून ताब्यात घेतले आहे. मात्र त्यासाठी पोलिसांना जवळपास तासभर कसरत करावी लागली. पित्याच्या विनवणीनंतर आनंदने दार उघडले. आनंद पटेल याचे वडील लखन पटेल याच्या विरोधात देखील काही गुन्हे दाखल असल्याची माहिती समोर आली आहे. मुंबईच्या गोरेगाव परिसरात असलेल्या नेस्को सेंटरमध्ये शनिवारी ११ एप्रिल रोजी ड्रग्ज पार्टी आयोजित करण्यात आली होती. या पार्टीमध्ये कॉलेजचे विद्यार्थी उपस्थित होते. तिथे उघडपणे ड्रग्ज सेवन सुरू होते. ड्रग्जच्या ओव्हरडोसमुळे २ विद्यार्थ्यांचा मृत्यू झाला.

# १ मेपासून रिक्षा, टॅक्सी चालकांना मराठी अनिवार्य

## लिहिता, वाचता न आल्यास परवाना रद्द; परिवहनमंत्री प्रताप सरनाईक यांचा पुनरुच्चार

मुंबई (दै. संध्या)

मुंबई: येत्या 1 मे महाराष्ट्र दिनापासून परवानाधारक रिक्षा व टॅक्सी चालकांना मराठी भाषा येणे अनिवार्य करण्यात येणार आहे. याबाबत मोटार परिवहन विभागाच्या 59 प्रादेशिक व उपप्रादेशिक कार्यालयांमार्फत परवाना तपासणी मोहीम राबविण्यात येणार असून संबंधित चालकांना मराठी लिहिता व वाचता येते का, याची पडताळणी केली जाणार आहे. मराठी भाषेचे ज्ञान नसलेल्या चालकांचे परवाने रद्द करण्यात येतील, असा इशारा परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी पुन्हा एकदा दिला आहे.



मंत्री सरनाईक म्हणाले की, मोटार परिवहन विभागामार्फत रिक्षा किंवा टॅक्सी चालकांना परवाना देताना स्थानिक भाषेचे, म्हणजेच मराठी भाषेचे ज्ञान असणे हा नियम आधीपासूनच लागू आहे. मात्र, मुंबई महानगर क्षेत्र, छत्रपती संभाजीनगर, नागपूर यांसारख्या शहरांमध्ये अनेक परवानाधारक चालकांना प्रवाशांशी मराठीत संवाद साधता येत नाही, तसेच काही चालक मराठी बोलण्यास टाळाटाळ करतात, अशा तक्रारी मोठ्या प्रमाणात प्राप्त झाल्या आहेत.

**...तर परिवहन अधिकाऱ्यांवरही होणार कठोर कारवाई!**

ज्या प्रदेशात आपण राहतो त्या प्रदेशाची भाषा व्यवसायासाठी शिकणे हे प्रत्येकाचे कर्तव्य आहे. आपल्या मातृभाषेचा अभिमान असणे जितके आवश्यक आहे, तितकेच इतर राज्यात व्यवसाय करताना त्या राज्याच्या भाषेचा आदर करणेही महत्त्वाचे आहे. म्हणूनच 1 मेपासून सर्व परवानाधारक रिक्षा व टॅक्सी चालकांना मराठी भाषा लिहिता व वाचता येणे बंधनकारक राहील. नियमांचे पालन न करणाऱ्या चालकांचे परवाने रद्द करण्यात येतील. तसेच नियमांकडे दुर्लक्ष करून चुकीच्या पद्धतीने परवाने देणाऱ्या परिवहन अधिकाऱ्यांवरही कठोर कारवाई करण्यात येईल, असेही सरनाईक यांनी स्पष्ट केले.

## पिरामल फायनान्स लिमिटेडचा महाराष्ट्रात विस्तार

मुंबई (दै. संध्या)

रामल फायनान्स लिमिटेड या रिटेल क्षेत्रावर लक्ष केंद्रित करणाऱ्या अग्रगण्य एनबीएफसी कंपनीने आपल्या प्रगतीत महत्त्वाचा टप्पा गाठत, एकूण व्यवस्थापनाखालील मालमत्तेत (एयूएम) 1 लाख कोटींचा आकडा पार केल्याची घोषणा केली आहे. हा टप्पा भारतातील प्रादेशिक आणि अर्ध-शहरी भागांमध्ये, विशेषतः महाराष्ट्रात, कंपनीची मजबूत वाढ आणि चांगली कामगिरी दर्शवतो.

महाराष्ट्र हे पिरामल फायनान्स लिमिटेडसाठी सर्वात मोठ्या बाजारपेठांपैकी एक आहे. नाशिक, नागपूर, पुणे, ठाणे आणि कोल्हापूर यांसारख्या प्रमुख शहरांमध्ये कंपनीच्या 77 शाखा असून, मजबूत कर्ज व्यवसाय उभा राहिला आहे. राज्यात गृहकर्ज आणि व्यवसाय कर्जासाठी मागणी वाढत असून, नव्याने विकसित होत असलेल्या शहरांमुळे आणि छोट्या गावांमुळे या वाढीस चालना मिळत आहे. गेल्या चार वर्षांत पिरामल फायनान्सने आपले नेटवर्क मोठ्या प्रमाणात वाढवले आहे. आर्थिक वर्ष 2021 मध्ये 20 पेक्षा कमी शाखा असलेल्या कंपनीच्या आता 26 राज्यांतील 460 शहरांमध्ये 650 पेक्षा जास्त शाखा कार्यरत आहेत. ही वाढ मुख्यतः टियर 2 आणि टियर 3 शहरांमध्ये, तसेच महाराष्ट्रातील अनेक जिल्ह्यांमध्ये विस्तार केल्यामुळे झाली आहे.

## पालिकेत १ कोटी ८ लाखाची वाहन खरेदी!

### १४ महिंद्रा बोलेरो गाड्यांचा समावेश; सर्व गाड्यांची किंमत तीन ते चार कोटी रुपये इतकी

मुंबई (दै. संध्या)

मुंबई महानगरपालिकेमध्ये मोठ्या प्रमाणात वाहन खरेदी करण्यात येत आहे. अलीकडेच महापौरांसह विविध समित्यांच्या अध्यक्षांसाठी व अधिकाऱ्यांसाठी करोडो रुपयांची वाहन खरेदी केल्यानंतर आता पाणीपुरवठा विभागासाठी 1 कोटी 8 लाख रुपयांची वाहन खरेदी करण्यात येणार आहे.



मुंबई महानगरपालिकेने नवनिर्वाचित महापौरांसाठी इनोव्हा हायब्रीड गाडीसह विविध समित्यांच्या अध्यक्षांसाठी महिंद्राच्या स्कॉर्पिओ गाड्या घेतल्या आहेत. त्याशिवाय पालिकेच्या काही खाते प्रमुखांसाठीही स्कॉर्पिओ गाड्या खरेदी करण्यात आले आहे. या सर्व गाड्यांची किंमत तीन ते चार कोटी रुपये इतकी आहे.

आता पुन्हा पालिकेच्या पाणीपुरवठा विभागासाठी 14 महिंद्रा बोलेरो गाड्या खरेदी करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. पालिकेच्या ताफ्यामध्ये विविध विविध विभागातील खाते प्रमुख व वरिष्ठ अधिकाऱ्यांसाठी 379 कार, जीप, पिकअप, बस, टँकर या प्रकारची वाहने आहेत. या वाहनांचे आयुर्मान संपल्यानंतर ती वाहने मोडीत काढून त्या बदल्यात नवीन वाहने घेण्यात येत असल्याचे पालिकेकडून सांगण्यात आले.

सध्या कार्यकारी अभियंता (परिवहन) पाणीपुरवठा व मलनिःसारण विभागांत 128 जीप वाहने असून, शहर, पश्चिम उपनगरे, पूर्व उपनगरे व नगरबाह्य विभागातील विविध खात्यांतील अधिकाऱ्यांना कार्यालयीन कामकाजाकरीता ही वाहन दिली जातात.

त्यातील, 14 गाड्या महिंद्रा आणि महिंद्रा बोलेरो बनावटीच्या जीप असून ही वाहने 2010 मध्ये खरेदी करण्यात आलेली होती. या वाहनांना मार्च 2026 मध्ये 15 वर्षे पूर्ण झाली असून, त्यामुळे ही वाहने मोडीत काढण्यात येणार आहेत. परिणामी या खात्यात वाहनांची कमतरता भासण्याची शक्यता आहे. यासाठी तातडीने नवीन वाहने खरेदी करण्याचा निर्णय घेण्यात आल्याचे पालिकेकडून सांगण्यात आले.

## विवो T5 प्रो लॉन्च: 9020mAh बॅटरीसह पॉवरफुल स्मार्टफोन

मुंबई (दै. संध्या)

दीर्घकाळ टिकणारी बॅटरी, उच्च कार्यक्षमता आणि प्रगत फीचर्स यांवर लक्ष केंद्रित करत विवो इंडियाने त्यांच्या टी सिरीजमधील नवीन स्मार्टफोन Vivo T5 Pro 5G सादर केला आहे. 9020mAh क्षमतेची आतापर्यंतची सर्वात मोठी बॅटरी, शक्तिशाली प्रोसेसर आणि गेमिंग-केंद्रित तंत्रज्ञानामुळे हा स्मार्टफोन बाजारात नवा बेंचमार्क ठरण्याची शक्यता आहे.

या स्मार्टफोनमध्ये स्नॅपड्रॅगन 7s Gen 4 प्रोसेसर देण्यात आला असून, तो सुमारे 1.2 दशलक्ष अँटूटू स्कोअरपर्यंत कार्यक्षमतेची हमी देतो. 120fps पर्यंत गेमिंग सपोर्टमुळे गेमिंगप्रेमींसाठी हा फोन विशेष आकर्षण ठरतो. यासोबतच 7000 चौरस मिमीची मोठी व्हेपर चेंबर कूलिंग सिस्टीम दिली असून, दीर्घकाळ वापरातही तापमान नियंत्रण प्रभावी राहते.

भारी बॅटरी, जलद चार्जिंग Vivo T5 Pro ची 9020mAh बॅटरी चौथ्या पिढीच्या सिलिकॉन-कार्बन तंत्रज्ञानावर आधारित असून, दीर्घकाळ टिकणारी बॅटरी बॅकअप देते. 90W फ्लॅशचार्जमुळे अवघ्या 37 मिनिटांत 50% चार्जिंग होते. कंपनीनुसार, हा फोन 12.6 तास गेमिंग आणि 37 तास व्हिडिओ प्लेबॅक सहज देऊ शकतो. बॅटरी लाइफ एक्सटेंडर, ओव्हरनाइट चार्जिंग प्रोटेक्शन आणि बायपास चार्जिंगसारखी वैशिष्ट्येही यात आहेत.

144Hz AMOLED डिस्प्ले आणि प्रीमियम व्हिज्युअल्स फोनमध्ये 1.5K रिझोल्यूशनचा 144Hz AMOLED डिस्प्ले असून, 5000 निट्स लोकल पीक ब्राइटनेस आणि HDR10+ सपोर्ट दिला आहे. 1 अब्जाहून अधिक रंग सपोर्टमुळे व्हिडिओ आणि इमेजेस अधिक जिवंत दिसतात. आय-केअर तंत्रज्ञानामुळे दीर्घकाळ वापरात डोळ्यांवर ताण कमी होतो.

## पॉलिसीबझारकडून सर्वोत्कृष्ट कामगिरी करणाऱ्यांचा सन्मान

मुंबई (दै. संध्या)

मुंबई,१५ एप्रिल, २०२६: भारतातील सर्वात मोठ्या ऑनलाइन विमा प्लॅटफॉर्मपैकी एक असलेल्या पॉलिसीबझारने, आपल्या 'आसियन रश' (ASEAN RUSH) कार्यक्रमांतर्गत सर्वोत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या सल्लागारांना ३९ लाख रुपयांच्या भेटवस्तू देऊन सन्मानित केले. आरोग्य, टर्म आणि बचत (देशांतर्गत आणि अनिवासी भारतीय) यांसारख्या विविध व्यावसायिक विभागांमधून निवडलेल्या एकूण ८९ सर्वोत्कृष्ट सल्लागारांना सन्मानित करण्यात आले. ही बक्षिसे वेगवेगळ्या स्तरांमध्ये विभागली गेली होती—सर्वोत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या



सल्लागाराला मलेशियाची सर्व-खर्च-सहित सहल मिळाली, तर इतर विजेत्यांना बाईक्स, आयफोन, ॲप वॉचेस, स्मार्ट टीव्ही आणि ॲमेझॉन व्हाउचर्स यांसारख्या भेटवस्तू मिळाल्या.

हा नवीनतम बदल पॉलिसीबझारच्या 'रिवॉर्ड्स अँड रिकग्निशन' (R&R) फ्रेमवर्कमधील एक धोरणात्मक बदल दर्शवतो, जो पारंपरिक रोख प्रोत्साहनांपासून उच्च-मूल्याच्या भेटवस्तू आणि आंतरराष्ट्रीय प्रवासाच्या अनुभवांवर लक्ष केंद्रित करण्याकडे वळत आहे. या यशानंतर, कंपनीने 'आसियान रश' कार्यक्रम सुरू केला आहे, ज्यामध्ये या वर्षीच्या विजेत्यांना मलेशियाची सर्व-खर्च-सहित सहल आणि इतर मौल्यवान भेटवस्तू मिळतील.

पॉलिसीबझारचे सह-संस्थापक आणि मुख्य विक्री अधिकारी, जेरी भुतिया म्हणाले, "कुटुंबांना त्यांचे आर्थिक भविष्य सुरक्षित करण्यास मदत करण्याच्या व्यापक उद्देशासाठी पॉलिसीबझार कटिबद्ध आहे. आम्ही आमची भूमिका केवळ विमा प्रदान करण्यापुरती मर्यादित ठेवत नाही; आम्ही जागरूकता, विश्वास आणि उपलब्धता निर्माण करण्यासाठी काम करतो, जेणेकरून प्रत्येक कुटुंब आपल्या सर्वात महत्त्वाच्या गोष्टींचे संरक्षण करू शकेल. आपल्या ग्राहकांचा विमा प्रवास सुलभ करण्यासाठी अथक प्रयत्न करणाऱ्या सल्लागारांना सन्मानित करून, आम्ही आमच्या संस्थेचा पाया अधिक मजबूत करत आहोत. जेव्हा आम्ही आमच्या कर्मचाऱ्यांच्या आनंदात आणि विकासात गुंतवणूक करतो, तेव्हा आम्ही अखेरीस आमच्या ग्राहकांना एक उत्कृष्ट आणि मूल्य-आधारित अनुभव देतो."

## एएमएसकडून पुणे जीसीसीचा विस्तार; भारत ठरतोय जागतिक टॅलेंट बॅकबोन

मुंबई (दै. संध्या)

जागतिक टॅलेंट ॲक्विझिशन आणि ऑर्केस्ट्रेशन सोल्यूशन्स क्षेत्रातील अग्रगण्य कंपनी एएमएस (AMS) ने पुण्यातील आपल्या पहिल्या इंडिया-आधारित ग्लोबल कॅपेबिलिटी सेंटर (GCC) चा विस्तार जाहीर केला आहे. या विस्तारामुळे जागतिक पातळीवरील ऑपरेशन्समध्ये भारताची धोरणात्मक टॅलेंट बॅकबोन म्हणून असलेली भूमिका अधिक मजबूत झाली आहे.

हा विस्तार एएमएसकडून ईएमईए (EMEA), एपीसी (APAC), अमेरिका आणि यूके या आंतरराष्ट्रीय बाजारपेठांमधील वाढत्या मागणीला प्रतिसाद म्हणून करण्यात येत आहे. कंपनी भारतातील आपल्या कार्यबलाचा विस्तार करत असून, जागतिक ग्राहकांना अधिक सक्षम आणि स्केलेबल सेवा देण्यावर भर देत आहे. भारत आज जगातील आघाडीचा जीसीसी हब म्हणून उदयास आला असून सध्या देशात १,७०० हून अधिक जीसीसी कार्यरत आहेत आणि २०३० पर्यंत ही संख्या सुमारे २,५०० पर्यंत पोहोचण्याची अपेक्षा आहे. केवळ खर्चिक फायद्यांपलीकडे जाऊन, संस्थांना भारतात विशेष कौशल्ये, डिजिटल क्षमता आणि स्केलेबल ग्लोबल सेवा मिळत असल्यामुळे भारताचे महत्त्व वाढत आहे.

# धारावीकरांनो, पावसाळ्यापूर्वी घरे सोडा! डीआरपीची सूचना

## सेक्टर 6 पासून पुनर्वसन इमारतींची बांधकामे सुरू होणार

मुंबई (दै. संध्या)

धारावीच्या सेक्टर सहापासून पुनर्वसन इमारतींच्या बांधकामास सुरुवात होणार असून, त्यासाठी पावसाळ्यापूर्वी घरे रिकामी करा, असे आदेश जारी झाले आहेत.

विशेष म्हणजे धारावीतील घर रिकामे केल्यानंतर या रहिवाशांना स्थलांतरासाठी एकरकमी पाच हजार रुपयाचे अनुदान मिळणार असून, भाड्याने राहण्याचा पर्याय स्वीकारणाऱ्या पात्र रहिवाशांना कायमस्वरूपी घर मिळेपर्यंत दरवर्षी 5 टक्के वाढीसह भाडे अनुदान दिले जाणार असल्याचे सांगण्यात



आले. हे भाडे किती मिळेल आणि त्या भाड्यात मुंबईतील किंवा उपनगरात घर मिळेल का हे स्पष्ट नाही.

धारावी पुनर्विकास प्रकल्प (डीआरपी) अंतर्गत माटुंगा रेल्वे परिसरातील सेक्टर-6 मध्ये पुनर्वसन इमारतींचे बांधकाम सुरू करण्यासाठी सार्वजनिक सूचना प्रसिद्ध करण्यात आली आहे. धारावीतील लाखो नागरिकांसाठी 'की-टू-की' पुनर्वसन घरे उभारण्यासाठी गणेशनगर -मेघवाडी, एसव्हीपी नगर, आजाद नगर अ व ब, आजाद नगर क तसेच कमला रमण नगर या भागांतील रहिवाशांचे स्थलांतर आवश्यक असल्याचे ही सूचना बजावते.

या भागातील रहिवाशांनी मान्सून सुरू होण्यापूर्वी किंवा नव्या शैक्षणिक वर्षाच्या प्रारंभापूर्वी आपली घरे रिकामी करावीत, असे आवाहन या सूचनेतून करण्यात आले आहे. रहिवाशांनी लवकर स्थलांतर केल्यास एकाच वेळी विविध ठिकाणी बांधकाम सुरू करता येईल आणि पुनर्वसन घरे लवकर उपलब्ध करून देता येतील, असे एका डीआरपी अधिकाऱ्याने सांगितले.

डीआरपीच्या माहितीनुसार, माटुंगा येथील रेल्वे जमीन धारावी अधिसूचित क्षेत्रात (डीएनए) समाविष्ट करताना ती मोकळी जमीन असल्याचे गृहीत धरले होते. मात्र, या जमिनीवर झोपडपट्टीधारक वास्तव्यास असल्याने बांधकाम सुरू करण्यासाठी त्यांचे स्थलांतर अपरिहार्य आहे. स्थलांतर प्रक्रियेसाठी रहिवाशांना तात्पुरत्या निवासस्थानी (ट्रान्झिट ॲकमोडेशन) राहण्याचा किंवा भाड्याच्या घरात स्थलांतर करण्याचा पर्याय देण्यात आल्याचेही अधिकाऱ्यांनी सांगितले.

## थोडक्यात पण महत्वाचे...



### माजी विद्यार्थ्यांचा स्नेह मेळावा व कृतज्ञता सोहळा उत्साहात संपन्न

औंध (दैनिक संध्या) : जनता शिक्षण संस्था, पुणे-12 अंतर्गत श्री शिवाजी विद्या मंदिर व कनिष्ठ महाविद्यालय, औंध येथे इयत्ता 10 वी (सन 2002–2003) बॅचचा माजी विद्यार्थी स्नेह मेळावा व कृतज्ञता सोहळा रविवारी (दि. 12 एप्रिल 2026) उत्साहपूर्ण आणि भावनिक वातावरणात पार पडला. या कार्यक्रमाला विद्यमान प्राचार्य रवींद्रनाथ शिवराम नवले, उपप्राचार्य विठ्ठल नारायण चव्हाण, पर्यवेक्षिका स्वाती देशमुख, माजी प्राचार्य जे. बी. जकाते तसेच जनता शिक्षण संस्थेचे उपाध्यक्ष व माजी प्राचार्य नंदकुमार पाटील यांची प्रमुख उपस्थिती होती. याशिवाय शिक्षकवृंद, शिक्षकेतर कर्मचारी आणि माजी विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाची सुरुवात छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण, शिववंदना, सरस्वती पूजन व दीपप्रज्वलनाने पारंपरिक पद्धतीने करण्यात आली. स्वागत गीत, प्रभावी सूत्रसंचालन आणि शिक्षकांचे मार्गदर्शनपर मनोगत यामुळे कार्यक्रमाला विशेष उंची लाभली. तसेच दिवंगत शिक्षक व विद्यार्थ्यांना श्रद्धांजली अर्पण करून भावपूर्ण स्मरण करण्यात आले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन माजी विद्यार्थिनी संगीता मनाळे, ज्योती गडेराव आणि माधुरी वायदंडे यांनी केले. स्वागत गीत संदीप गुरव, रुक्मिणी सुर्वे आणि ज्योती भोसले यांनी सादर केले. माजी विद्यार्थी प्रतिनिधींमध्ये ॲड. अब्दुल ढाले, स्वाती घायाळ आणि नेहा गोळे यांनी मनोगत व्यक्त केले, तर शिक्षकीय मनोगत स्नेहलता जगताप यांनी मांडले. अध्यक्षीय मनोगत प्राचार्य नवले यांनी व्यक्त केले. कार्यक्रमाच्या शेवटी आभार प्रदर्शन डॉ. मल्हारी नागटिळक यांनी केले. यावेळी सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचा शाल, श्रीफळ, स्मृतिचिन्ह व पर्यावरणपूरक 'कुबेर' (Crassula) रोप देऊन सन्मान करण्यात आला. कार्यक्रमाचे नियोजन विविध समित्यांमार्फत अत्यंत सुयोग्य पद्धतीने करण्यात आले होते. विशेष म्हणजे, या मेळाव्यासाठी चिपळूण, नाशिक, सासवड, बारामती, मुंबई आदी ठिकाणांहून माजी विद्यार्थी आवर्जून उपस्थित राहिले. सुमारे 120 विद्यार्थ्यांची उपस्थिती होती, त्यामध्ये 40 ते 50 मुलींचा सहभाग लक्षणीय होता. तब्बल 23 वर्षांनंतर एवढ्या मोठ्या संख्येने विद्यार्थी एकत्र आल्याने आनंदाचे वातावरण निर्माण झाले. यावेळी 2002–2003 बॅचच्या विद्यार्थ्यांनी शाळेला सुमारे 50 हजार रुपये किमतीचे लेझर प्रिंटर, स्कॅनर व झेरॉक्स मशीन भेट दिले. या उपक्रमाचे सर्व स्तरांतून कौतुक होत आहे. हा स्नेह मेळावा केवळ एक कार्यक्रम न ठरता जुन्या आठवणींना उजाळा देणारा, मैत्रीचे बंध दृढ करणारा आणि कृतज्ञता व्यक्त करणारा अविस्मरणीय सोहळा ठरला आहे.

### महापालिकेचा गलथान कारभार चिमुकला खड्ड्यात पडून जखमी

पिंपरी (दैनिक संध्या) : एका ठेकेदाराला अनेक कामे दिल्याने ठेकेदार हाती घेतलेली सर्वच काम अर्धवट केल्याने एक चिमुकला गंभीर जखमी झाल्याची घटना घडली आहे.रहाटणी येथील गणराज कॉलनी येथे ठेकेदारराने गेल्या आठ दिवसापासून नळाची पाइपलाइन जोडूनही खड्डे पूर्ण न बुजवल्याने चिमुकला या ठिकाणी पडून गंभीर जखमी झाला आहे त्याचा कपाळाला धारदार दगड लागल्याने साधारण पाच टाके पडले असून त्याचा डोळा थोडक्यात बचावला आहे या पूर्वी देखील एक लहानगा खेळत असताना त्याच्या पायाला दुखापत झाल्याची घटना घडली आहे.काम अर्धवट ठेऊन ठेकेदाराने दुसरे काम सुरू केल्याने गेल्या आठ दिवसाहून अधिक पासून हा रस्ता खोदून त्यावर सर्व राडारोडा तसाच ठेवल्यामुळे हा अपघात झाला आहे वेळोवेळी नगरसेवकांकडे तक्रार करूनही काम सुरू होत नसल्याने याचा मानसिक त्रास नागरिकांना होत आहे.यामुळे शाळेला सुट्ट्या लागूनही चिमुकले खेळण्याचा आनंद घेऊ शकत नाहीये परंतु अशा धोकादायक करून ठेवलेल्या रस्त्यामुळे एखादा अनुचित प्रकार घडला तर याची जबाबदारी महापालिका घेणार की ठेकेदार?हा प्रश्न मात्र अनुपस्थित आहे एकाच ठेकेदाराला शहरातील अनेक कामे दिल्यामुळे हा प्रसंग ओढवला आहे ठेकेदाराला दिलेल काम पूर्ण होत आहे की नाही हे पाहणे महापालिकेचे काम असतानाही महापालिका मात्र डोळे झाकून निद्रावस्थेत असताना पहायला मिळत आहे परंतु आता तरी चिमुकल्याला इजा झाल्यावर प्रशासन जागे होणार का हेच पहावे लागणार आहे.

### धक्कादायक.. काळेवाडीत अडीच वर्षीय चिमुरडीवर लैंगिक अत्याचार



पिंपरी (दैनिक संध्या) : अडीच वर्षीय चिमुरडीवर लैंगिक अत्याचार केल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली असून परिसरात संतापाची लाट उसळली आहे. काळेवाडी येथे सोमवार (दि.१३) दुपारी एकच्या सुमारास हा प्रकार घडला. याप्रकरणी पीडित चिमुरडीच्या आईने काळेवाडी पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे. त्यानुसार, विजय भोसले (४७, रा. काळेवाडी) याच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी आरोपीला अटक केली आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, आरोपीने चिमुरडीला आंबा देण्याचे आमिष दाखवून तिला जवळच्या खोलीत नेले. त्यानंतर तिच्यावर लैंगिक अत्याचार केले. काही वेळाने चिमुरडी अस्वस्थ दिसून आल्याने तिच्या आईला संशय आला. चौकशी केल्यानंतर हा प्रकार उघडकीस आला. घटनेनंतर चिमुरडीच्या आईने काळेवाडी पोलिस ठाण्यात धाव घेऊन तक्रार नोंदवली. पोलिसांनी घटनास्थळी भेट देत पाहणी केली आणि आरोपीला ताब्यात घेतले. पीडित चिमुरडीला वैद्यकीय तपासणीसाठी रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. या घटनेमुळे परिसरात संतापाचे वातावरण निर्माण झाले असून आरोपीवर कठोर कारवाई करण्याची मागणी नागरिकांकडून होत आहे. काळेवाडी पोलिस तपास करत आहेत.

### पवना नदी प्रदूषणाविरोधातील तुकाराम भोंडवे यांच्या उपोषणाला शिंदे यांचा पाठिंबा

पिंपरी (दैनिक संध्या) : पिंपरी-चिंचवड शहरातील पवना नदीतील वाढत्या प्रदूषणाच्या गंभीर समस्येकडे लक्ष वेधण्यासाठी माजी नगरसेवक तुकाराम भोंडवे यांनी सुरू केलेल्या उपोषणाला आता विविध स्तरांतून पाठिंबा मिळत आहे. तुकाराम भोंडवे यांच्या मागण्यांसाठी युवासेना चिंचवड विधानसभा उपशहरप्रमुख सागर एकनाथ शिंदे यांनीही आपला पाठिंबा दर्शविला आहे. याबाबत सागर शिंदे यांनी माजी नगरसेवक तुकाराम भोंडे यांना पाठिंब्याचे पत्र दिले आहे. त्या पत्रात नमूद केले आहे की, पिंपरी-चिंचवड शहरातील नद्यांचे वाढते प्रदूषण ही अत्यंत गंभीर बाब असून नागरिकांच्या आरोग्याशी संबंधित हा प्रश्न तातडीने सोडविणे आवश्यक आहे. तसेच, शिवसेना नेते व खासदार श्रीरंग बारणे, युवा सेनेचे पश्चिम महाराष्ट्र प्रमुख गटनेते विश्वजीत बारणे आणि नगरसेविका सुलभा उबाळे यांच्या मार्गदर्शनाखाली या आंदोलनाला पाठिंबा देत असल्याचे सागर शिंदे यांनी म्हटले आहे. प्रशासनाने या प्रश्नाकडे गांभीर्याने लक्ष देत ठोस व प्रभावी उपाययोजना कराव्यात, अशी मागणीही करण्यात आली आहे.

# राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्यावतीने बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन



**पिंपरी (दै. संध्या)**

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी भारतात आणि परदेशात आपले शिक्षण पूर्ण करून शैक्षणिक क्षेत्रात प्रावीण्य मिळवले. त्यांनी कोलंबिया विद्यापीठ आणि लंडन स्कूल ऑफ इकॉनॉमिक्समधून पदव्या मिळवल्या, तसेच ६४ हून अधिक विषय आणि ११ भाषांवर प्रभुत्व प्राप्त केले जे त्यांच्या काळातील एक अतुलनीय विद्वत्तापूर्ण यश होते. डॉ. आंबेडकरांनी आपले संपूर्ण आयुष्य शोषित वर्गाच्या उन्नतीसाठी समर्पित केले. मसुदा समितीचे अध्यक्ष म्हणून, त्यांनी भारतीय राज्यघटनेला आकार देण्यात, मूलभूत हक्कांची हमी देण्यात आणि लोकशाहीचा पाया घालण्यात महत्त्वपूर्ण भूमिका बजावली. भारताचे पहिले कायदामंत्री म्हणून त्यांचे योगदान कायद्यापुरते मर्यादित नव्हते त्यांनी लैंगिक समानता, कामगार सुधारणा आणि सर्वांसाठी शिक्षणाचा पुरस्कार केला. १९९० मध्ये, राष्ट्रासाठी केलेल्या त्यांच्या अफाट सेवेचा गौरव म्हणून त्यांना भारताचा सर्वोच्च नागरी सन्मान, भारतरत्न प्रदान करण्यात आला. डॉ. आंबेडकरांनी दाखवून दिले की ज्ञान हेच खरे सक्षमीकरण आहे आणि प्रत्येक व्यक्ती, तिची पार्श्वभूमी काहीही असली तरी, सन्मानास पात्र आहे. समानता, न्याय आणि सर्वांप्रति आदर यावर आधारित समाजाचे त्यांचे ध्येय आपण पुढे नेऊया. असे निरूपण राष्ट्रवादी काँग्रेसचे शहराध्यक्ष योगेश बहल यांनी केले. महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त पिंपरी येथील स्मारक तसेच राष्ट्रवादी काँग्रेसच्या खराळवाडी, पिंपरी येथील मध्यवर्ती कार्यालयात देखील शहराध्यक्ष योगेश बहल यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

यावेळी बोलताना माजी नगरसेवक ॲड.गोरक्ष लोखंडे म्हणाले, आंबेडकरांनी अस्पृश्यांच्या उन्नतीसाठी राज्यघटनेत ज्या विशेष तरतुदी केल्या, त्यामुळे अस्पृश्यांच्या हक्कांना घटनात्मक वैधता प्राप्त झाली. भारत सरकारच्या विविध समाजकल्याणकारी योजनांचे मोठे श्रेय आंबेडकरांच्या कार्यास जाते. हिंदू कोड बिलात सुचवलेल्या उपाययोजना पुढे कायद्याच्या रूपाने अमलात आल्या. बाबासाहेबांनी विषमतेविरुद्ध लढून शिक्षण, संघटना आणि संघर्षाचा मंत्र दिला. त्यांनी अस्पृश्यता निवारण, महिला हक्क आणि शोषितांना मानवी हक्क मिळवून देण्यासाठी आयुष्य वेचले, त्यांचे विचार आजही तरुण पिढीला प्रेरणा देत राहतील.

तसेच सामाजिक न्याय विभागाचे अध्यक्ष संजय औसरमल यांनी देखील आपले मनोगत व्यक्त केले. यावेळी शहराध्यक्ष योगेश बहल, कार्याध्यक्ष फजल शेख, विजय लोखंडे, मा. नगरसेवक पंडीत गवळी, ॲड. गोरक्ष लोखंडे, प्रकांश सोमवंशी, राजेंद्र जगताप, शेखर चिंचवडे, नगरसेविका वर्षा जगताप, योगिता बारणे, प्रदेश ओबीसी कार्याध्यक्ष ॲड. सचिन औटे, प्रदेश उपाध्यक्ष ज्ञानेश्वर कांबळे, सामाजिक न्याय अध्यक्ष संजय औसरमल, प्रदेश सरचिटणीस राजेंद्रसिंग वालिया, अकबर मुल्ला, उपाध्यक्ष शकुल्ला पठाण, कुमार कांबळे, ओबीसी सेल अध्यक्ष प्रशांत महाजन, झोपडपट्टी सेल अध्यक्ष रवींद्र ओव्हाळ, उद्योग व व्यापार सेल अध्यक्ष श्रीकांत कदम, संभाजी बारणे, शहर उपाध्यक्ष बाळासाहेब पिल्लेवार, चिंचवड विधानसभा महिला अध्यक्षा संगीता कोकणे, महिला उपाध्यक्षा भाग्यश्री मस्के, सरचिटणीस नीलम कदम, देवी थोरात, राजू चांदणे, सुरेंद्र सिंग बाला, चंदू हलगी, समीर थोरात, महेंद्र तापकीर, अभिजीत आल्हाट, धनाजी तांबे, सुनिल अडागळे इ. पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते.

## रिक्षा चालकांचा मेळावा संपन्न



**पिंपरी (दै. संध्या)**

"विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी भारतीय घटनेच्या माध्यमातून देशातील प्रत्येक नागरिकाला 'एक व्यक्ती, एक मत' हा अधिकार देऊन समानतेची क्रांती घडवून आणली. आज गरिबाच्या मतालाही पंतप्रधानांच्या मताइतकीच किंमत आहे. "मात्र, दिवसरात्र कष्ट करणाऱ्या रिक्षा चालक, टॅक्सी चालक आणि असंघटित कष्टकऱ्यांना समाजात अद्याप हक्काची 'पत' (सन्मान आणि आर्थिक स्थैर्य) मिळालेली नाही. हीच पत आणि कष्टाला सन्मान मिळवून देण्यासाठी आमचा लढा सुरू आहे," असे प्रतिपादन महाराष्ट्र रिक्षा पंचायतीचे संस्थापक अध्यक्ष गोरगरीब कष्टकऱ्यांचे नेते डॉ. बाबा कांबळे यांनी केले. महाराष्ट्र रिक्षा पंचायत संलग्न डांगे चौक येथील विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर रिक्षा स्टँडच्या वतीने आयोजित जयंती उत्सवात रिक्षा चालकांना मार्गदर्शन करताना ते बोलत होते. डॉ. बाबा कांबळे पुढे म्हणाले की, "देशात ४५ कोटींहून अधिक असंघटित कामगार आहेत.

## डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्साहात साजरी



**पिंपरी (दै. संध्या)**

रहाटणी, काळेवाडी येथील शिवतेज क्रीडा व शिक्षण मंडळ संचलित लक्ष्मीबाई भाऊराव तापकीर इंग्लिश मीडियम स्कूल आणि श्रीमती लक्ष्मीबाई तापकीर माध्यमिक विद्यालय, काळेवाडी यांच्या संयुक्त विद्यमाने भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. या कार्यक्रमाच्या माध्यमातून महामानवाच्या विचारांना उजाळा देण्यात आला. विशेष म्हणजे डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांनी महिलांना प्रथम प्रधान दिले त्यावरती सर्वांनी आपले मनोगत व्यक्त केले आणि यावेळेस सर्व विद्यार्थ्यांनी टाळ्यांच्या गजरात आवाज काढून त्यांच्या देण्यात प्रसन्न दिले. कार्यक्रमाचे स्वरूप आणि आकर्षण अध्यक्षस्थान: कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शशिकांत रसाळ उपस्थित होते. विद्यार्थ्यांचे सादरीकरण: विद्यार्थ्यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या जीवनावर आधारित प्रेरणादायी गाणी सादर केली. तडफदार भाषण: सुप्रिया खताळ या विद्यार्थिनीने आपल्या ओघवत्या आणि तडफदार भाषणाने उपस्थित सर्वांचे लक्ष वेधून घेतले. तिच्या भाषणाचे विशेष कौतुक करण्यात आले. या कार्यक्रमासाठी पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते. आपल्या पाल्यांच्या सादरीकरणाला दाद देण्यासाठी आणि महामानवाच्या स्मृतींना अभिवादन करण्यासाठी पालकांनी गर्दी केली होती. कार्यक्रमाचे नेटके नियोजन मुख्याध्यापक शशिकांत वाखारे व मुख्याध्यापिका कोयल सातपुते यांनी केले होते. संपूर्ण कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शितल शिंदे यांनी प्रभावीपणे पार पाडले.

## निगडी येथे भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना अभिवादन



**पिंपरी (दै. संध्या)**

भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त निगडी परिसरात उत्साहपूर्ण वातावरणात अभिवादन कार्यक्रम पार पडला. यावेळी महापुरुषांच्या प्रतिमांना पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. मोठ्या प्रमाणात महिला, युवक तसेच नागरिकांनी उपस्थित राहून बाबासाहेबांविषयी कृतज्ञता व्यक्त केली. कार्यक्रमात महिलांचा विशेष सहभाग पाहायला मिळाला. उपस्थित महिलांनी बाबासाहेबांच्या विचारांचा जागर करत सामाजिक समता, शिक्षण आणि मानवमुक्तीचा संदेश दिला.

यावेळी पल्लवी आंबोरे यांनी बाबासाहेबांना अभिवादन करताना महिला वर्गासह संपूर्ण मानवजातीसाठी त्यांनी दिलेल्या योगदानाचा गौरवपूर्ण उल्लेख केला. शिक्षण, समान हक्क, स्वाभिमान आणि न्यायासाठी बाबासाहेबांनी केलेला संघर्ष प्रेरणादायी असल्याचे त्यांनी सांगितले. जयंती उत्सवानिमित्त परिसरात जल्लोषाचे वातावरण निर्माण झाले होते. नागरिकांनी घोषणाबाजी करत बाबासाहेबांच्या विचारांना सलाम केला. युवकांनी शिस्तबद्ध आयोजन करत कार्यक्रम यशस्वी केला. या कार्यक्रमात पल्लवी आंबोरे, मीना लोखंडे, रीना साळुंखे, शारदा साळुंखे, नंदा तरकसे, अलका रामटेके, मालती आंबोरे, कल्पना वाघमारे, संगीता शिंदे, वैशाली सोनवणे, पुष्पा किरवले, भारती जोगदंड तसेच डी. एस. आंबोरे, युवा नेते नारायण लोखंडे, दिपक खैरनार, विष्णू लोखंडे, रमेश शिरसाठ, विक्रांत वाघमारे, स्वप्निल प्रधान, भारत तरकसे, करण वाघमारे, विघ्नेश जोगदंड, सुमित आंबोरे आदी उपस्थित होते. कार्यक्रमाच्या माध्यमातून बाबासाहेबांच्या विचारांचा जागर करत समता, बंधुता आणि सामाजिक न्यायाचा संदेश देण्यात आला.

## खरोशी येथील शाळेत विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्यासह खाऊचे वाटप

**पिंपरी (दै. संध्या)**

खरोशी (ता.खेड) येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेतील खरोशी गावठाण तसेच धारेवाडी,शेरेवाडी, अंगणवाडी विद्यार्थ्यांना महामानव विश्वरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५ व्या जयंतीचे औचित्य साधत स्वर्गीय अजिंक्य आण्णा निवृत्ती खिरीड सोशल फाऊंडेशन मोशी-पुणे यांच्या सौजन्याने वाढदिवसाच्या स्मृतीस आठवणींना उजाळा देण्याचे उद्देशाने शालेय शैक्षणिक साहित्य व खाऊचे वाटप करण्यात आले. आदिवासी डोंगराळ अतिदुर्गम भागातील विद्यार्थ्यांना शिक्षणाची ओढ लागावी या अनुषंगाने स्तुत्य उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. स्वर्गीय अजिंक्य आण्णा खिरीड यांचे अल्पशा आजाराने दोन महिन्यापूर्वी दुःखद निधन झाले होते. त्यांच्या आठवणींना उजाळा देण्याचे कार्य विशेषतः ग्रामिण भागात स्व.अजिंक्य आण्णा खिरीड सोशल फाउंडेशन मोशी व त्यांचे युवा मित्र मंडळ करत आहेत. स्तुत्य कार्यक्रमाच्या निमित्त बालचमुंच्या हस्ते स्व.अजिंक्य आण्णा खिरीड यांच्या वाढदिवसाच्या निमित्त बालचमूच्या हस्ते केक कापून वाढदिवस साजरा करण्यात आला. यावेळी शाळेतील विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्यां बरोबर केळी, ज्युस यांचे वाटप करून समारोप करण्यात आला.



# तळेगाव दाभाडे कृषी उत्पन्न बाजार समिती बरखास्त

## प्रशासकाची नियुक्ती; आमदार सुनील शेळके यांची राजकीय खेळी यशस्वी

**मावळ (दै. संध्या)**

मावळ तालुक्यातील कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये घडलेल्या नाट्यमय राजकीय घडामोडींमध्ये अखेर समिती बरखास्त होऊन प्रशासकाची नियुक्ती करण्यात आली असून, या संपूर्ण प्रकरणात आमदार सुनील शेळके यांची मोठी राजकीय खेळी यशस्वी ठरल्याची चर्चा रंगली आहे. तीन वर्षांपूर्वी मोठ्या खर्चात निवडून आलेल्या संचालक मंडळात राष्ट्रवादी काँग्रेसची स्पष्ट बहुमतासह सत्ता होती. सभापतीपदी संभाजी शिंदे तर उपसभापतीपदी नामदेव शेलार यांची नियुक्ती झाली होती. मात्र, ठरल्याप्रमाणे इतर संचालकांना संधी न देता या दोघांनी तीन वर्ष पदे न सोडल्याने असंतोष वाढत गेला.

या पार्श्वभूमीवर असंतुष्ट संचालकांनी एकत्र येत अविश्वास ठरावाची तयारी केली. त्याची चाहूल लागताच सभापती व उपसभापतींनी राजीनामे दिले. त्यानंतर नव्या निवडणुकीत राष्ट्रवादीकडे बहुमत असूनही अंतर्गत फुटीरतेमुळे भाजपला सभापतीपद पटकावण्यात यश आले. मात्र हा विजय काही तासांपुरताच ठरला. या घडामोडींची गंभीर दखल घेत आमदार सुनील शेळके, जिल्हाध्यक्ष विठ्ठलराव शिंदे व तालुकाध्यक्ष गणेश खांडगे यांनी राष्ट्रवादीच्या संचालकांची तातडीची बैठक घेऊन सर्वांना राजीनाम्याचे आदेश दिले.

या आदेशानुसार राष्ट्रवादीच्या १३ पैकी ९ संचालकांनी तत्काळ राजीनामे सादर केले, तर उर्वरित ४ जणांनी दुसऱ्या दिवशी राजीनामे दिले. त्यामुळे समितीतील बहुतांश संचालक बाहेर पडल्याने बाजार समिती बरखास्त होण्याचा मार्ग मोकळा झाला. या घडामोडींमुळे भाजपचे सभापतीपदाचे स्वप्न पूर्ण होण्याआधीच भंगले. दरम्यान, संचालक मंडळ अस्तित्वात नसल्यामुळे समितीचे कामकाज पूर्णतः ठप्प झाले आणि पहिली बैठकही कोरम अभावी फक्त चर्चेपुरतीच मर्यादित राहिली.




यानंतर संपूर्ण प्रकरणाचा अहवाल सहाय्यक निबंधकांकडून जिल्हा उपनिबंधकांकडे सादर करण्यात आला. महाराष्ट्र कृषी उत्पन्न खरेदी-विक्री (विकास व विनियमन) अधिनियम 1963 अंतर्गत कलम 45(1) नुसार जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, पुणे (ग्रामीण) श्री. प्रकाश जगताप यांनी आदेश काढत तळेगाव दाभाडे कृषी उत्पन्न बाजार समिती बरखास्त करून प्रशासकाची नियुक्ती केली. सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, मावळ, जि. पुणे श्री. नवनाथ अनपट यांची प्रशासक म्हणून नियुक्ती करण्यात आली असून आता समितीचे सर्व अधिकार त्यांच्या ताब्यात देण्यात आले आहेत.

दरम्यान, मावळ तालुक्यात आमदार सुनील शेळके यांच्या विरोधात जाऊन राष्ट्रवादी काँग्रेसच्या काही संचालकांनी भाजपला साथ देत मतदान केले होते. मात्र या निर्णयामुळे त्यांनाही मोठा फटका बसल्याची चर्चा आहे.

विशेष म्हणजे, पूर्वी राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये असलेले व नंतर भाजपमध्ये गेलेले श्री. सुभाष जाधव यांनी भाजपकडून निवडणूक लढवत राष्ट्रवादीचे काही संचालक फोडून सभापतीपद मिळवले होते. परंतु आमदार सुनील शेळके यांच्या निर्णायक राजकीय खेळीमुळे त्यांचे हे स्वप्न काही तासांतच भंगले. एकंदर, पक्षांतर्गत असंतोष, फुटीरता आणि त्यानंतर आमदार सुनील शेळके यांनी घेतलेला कठोर निर्णय यामुळे संपूर्ण समीकरण बदलले. अखेर बाजार समिती बरखास्त होऊन प्रशासकाची नियुक्ती करण्यात आली असून, मावळ तालुक्यात आमदार शेळके यांच्या या मोठ्या राजकीय खेळीची जोरदार चर्चा रंगताना दिसत आहे.

## थोडक्यात पण महत्वाचे...




### चाकण येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती साजरी

चाकण (दैनिक संध्या) : स्व.गुलाबराव गोरे शिक्षण संस्थेच्या येथील ज्ञानवर्धिनी विद्यालय, भामा इंग्लिश स्कुल आणि स्व.आमदार सुरेशभाऊ गोरे ज्युनियर कॉलेज मध्ये महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती विविध उपक्रमांनी उत्साहात साजरी करण्यात आली. संस्थेचे अध्यक्ष विकास गोरे यांनी प्रतिमा पूजन करून बाबासाहेबांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण केला. यावेळी चाकणच्या नगराध्यक्षा मनिषा गोरे, नगरसेवक नितिन गोरे, उपाध्यक्ष राजेंद्र गोरे, संचालक अंकुश पवार, विष्णू गोरे, ओंकार गोरे आदी उपस्थित होते. विकास गोरे यावेळी म्हणाले," डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी अस्पृश्य, बहुजन समाजासाठी अतुलनीय कार्य केले. दलित, मागासवर्गीय आणि शूद्रासाठी केलेले कार्य कौतुकास्पद आहे. जाती भेदाविरुद्ध लढा देण्यासाठी केलेला संघर्ष, बौद्ध धर्माची शिकवण आणि भारतीय राज्य घटनेचा तयार केलेला मसुदा याच्या माध्यमातून तयार झालेले भारतीय संविधान दिशादर्शक आहे. मार्गदर्शक कायदे मंडळातुन भारतीय लोकशाही ही जगातील एकमेव लोकांभिमुक राज्य घटना आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे विचार व आदर्श अंगीकरून प्रेरणादायी वाटचाल करणे गरजेचे आहे." प्रशालेच्या मुख्याध्यापिका प्रमिला गोरे, प्राचार्य सचिन आभाळे, प्रिंसिपल माधुरी गोरे, गणेश काळे, मनीषा दातीर, लीना चौधरी आदींनी या कार्यक्रमाचे आयोजन व संयोजन केले होते. मुख्याध्यापिका प्रमिला गोरे यांनी सर्वांचे आभार मानले.



### महात्मा ज्योतिबा फुले व विश्वरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती साजरी

बारामती (दैनिक संध्या) : क्रांतिसुर्य महात्मा ज्योतिबा फुले तसेच विश्वरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त चंद्रमणीनगर बौद्ध विहार महिला समितीच्या वतीने विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते.या कार्यक्रमांचे निमंत्रक आरती मारुतीराव शेंडगे (गव्हाळे) विरोधी पक्षनेते बारामती नगरपरिषद यांनी आयोजन केले होते.मोफत ब्लड/रक्त तपासणी,सुप्रसिद्ध बुधराणी हॉस्पिटल यांचे मोफत मोतीबिंदू निदान तसेच नेत्र तपासणी शिबिर,मोफत दंत तपासणी, इ.सी.जी,आरोग्य तपासणी शिबिर व युगेंद्रदादा पवार यांच्या प्रमुख उपस्थितीत स्नेह भोजनाचा कार्यक्रम आयोजित केला होता,त्यास मोठ्या प्रमाणावर प्रतिसाद मिळाला. तसेच महिलांसाठी विशेष स्पर्धा,होम मिनिस्टर,फनी गेम्स् ,थोर महान महिलांची वेशभुषा स्पर्धा,2 ते 3 मिनिटांचे प्रभावी भाषण,लेझीम नृत्यांचे प्रात्यक्षिक कार्यक्रम आयोजित केला होता.यावेळी महिलावर्ग मोठ्या प्रमाणात उपस्थित होत्या,सर्वांनी या कार्यक्रमांचा आनंद घेतला व कार्यक्रम अत्यंत उत्साहात आणि यशस्वीरित्या पार पडला. चंद्रमणीनगर बौद्ध विहार येथून विश्वरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर स्मारक या ठिकाणी अभिवादन रॅलीचे आयोजन करण्यात आले होते त्यावेळी समाजबांधवांनी उपस्थित राहून बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन केले.14 एप्रिल रोजी पुजा पाठाचा कार्यक्रमाचे आयोजित करण्यात आला होता.या कार्यक्रमात सर्व पक्षांतील तसेच राजकीय, सामाजिक सदस्य,नागरिक, महिला उपस्थित होत्या. या कार्यक्रमांचे आयोजन चंद्रमणीनगर बौद्ध विहार महिला समिती,बारामती शहर बौद्ध युवक संघटना, चंद्रमणीनगर,कै.मारूतीराव शेंडगे मित्र मंडळ,संविधान युवा प्रतिष्ठान यांनी केले होते.आयोजित केलेले सर्व कार्यक्रम चंद्रमणीनगर बौद्ध विहार,आमराई,बारामती याठिकाणी घेण्यात आले. या कार्यक्रमांसाठी मोठ्या संख्येने उपस्थित राहिल्याबद्दल चंद्रमणीनगर बौद्ध विहार महिला समितीने व आरती मारुतीराव शेंडगे (गव्हाळे) यांनी सर्वांचे मनःपूर्वक आभार मानले.



### रुई गावात डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्साहात साजरी....!

रुई (दैनिक संध्या) : डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५ व्या जयंतीनिमित्त रुई गावात विविध धार्मिक,सामाजिक व सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करून जयंती मोठ्या उत्साहात व जल्लोषात साजरी करण्यात आली. पहाटेपासूनच गावात निळ्या झेंड्यांनी सजावट करण्यात आली होती. ठिकठिकाणी आकर्षक रोषणाई,स्वागत फलक व बॅनर्समुळे संपूर्ण गावात उत्साहाचे वातावरण निर्माण झाले होते.जयंतीनिमित्त रुई येथील बुद्ध विहार येथे त्रिशरण व पंचशील उच्चारत भगवान गौतम बुद्धांना वंदन करून पूजा-पाठ करण्यात आला.बौद्ध वंदनेने कार्यक्रमाची सुरुवात झाली. यानंतर ग्रामस्थांनी मोठ्या श्रद्धेने बाबासाहेबांच्या प्रतिमेचे पूजन करून अभिवादन केले.उपस्थित मान्यवरांच्या हस्ते प्रतिमेला पुष्पहार अर्पण करण्यात आला. या प्रसंगी बारामती नगर परिषदेच्या नगरसेविका तथा उपगटनेते संपदा चौधर,प्रा.अजिनाथ चौधर,पत्रकार सुरज देवकाते,रत्नदीप कांबळे, प्रा.बापुराव खाडे,साईनाथ चौधर आदी मान्यवर उपस्थित होते. यावेळी मान्यवरांनी आपल्या भाषणातून बाबासाहेबांच्या जीवनकार्यावर प्रकाश टाकत त्यांनी दिलेल्या शिक्षण,समता,स्वातंत्र्य व बंधुता या मूल्यांचे महत्त्व अधोरेखित केले. तसेच वंचित व दुर्बल घटकांच्या हक्कांसाठी त्यांनी दिलेल्या लढ्याची आठवण करून देत त्यांच्या विचारांचा प्रसार करण्याचे आवाहन करण्यात आले. कुमारी श्रेया पाटील तसेच आर्यन उमापे या चिमुकल्यांनी बाबासाहेबांबद्दल विचार व्यक्त केल्याबद्दल शुभम कांबळे तसेच पंचशील मित्र मंडळ यांच्यातर्फे बक्षीस देण्यात आले. या कार्यक्रमाचे आयोजन पंचशील तरुण मंडळ व रुई ग्रामस्थ यांच्या वतीने करण्यात आले होते. कार्यक्रमास नगरसेवक विष्णुपंत चौधर,शिवाजी कांबळे,राजेंद्र कांबळे,शरद कांबळे,मच्छिंद्र चौधर, बाबासाहेब चौधर,मधुकर शिरसाट, दत्तात्रय चौधर,सुरज चौधर, मुख्याध्यापिका कांबळे मॅडम, शिक्षकवृंद,महिला भगिनी तसेच तरुण वर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होते. एकूणच रुई गावात डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्साहपूर्ण, प्रेरणादायी व एकात्मतेच्या भावनेतून साजरी करण्यात आली.

# शिरूर तालुक्यात पाणीटंचाई तीव्र

## टेल भागातील पाझर तलाव कोरडे; पिण्याच्या पाण्याचा प्रश्न गंभीर, तातडीने कालवा सुरू करण्याची मागणी

निमोणे (दै. संध्या)



शिरूर तालुक्यातील चासकमानच्या लाभक्षेत्रातील टेल भागामध्ये पाणीटंचाईचे संकट दिवसेंदिवस गडद होत चालले आहे, बहुतांश पाझर तलाव कोरडे पडले असून, या परिसरातील सर्वांत मोठा मोटेवाडी पाझर तलावात फक्त आठ दिवस पुरेल इतकाच पाणीसाठा शिल्लक असल्याने तातडीने चासकमानचे आवर्तन सोडा, अशी मागणी जिल्हा परिषद सदस्या वृषाली वाळके यांनी केली आहे. सध्या उन्हाची तीवता वाढत चालली असून, विहिरी, कूपनलिका, ओढे-नाले कोरडे पडले आहेत. चासकमानच्या टेल भागाला टंचाईच्या काळात प्रकल्पाचे पाणी हाच एकमेव आशेचा किरण आहे.

बहुतांश पाझर तलाव आटल्यामुळे शेतातील पिके कोमेजून चालली आहेत. मोटेवाडी पाझर तलावामुळे लंघेवाडी, चव्हाणवाडी, दुर्गेवस्ती आदी परिसरातील पिण्याच्या पाण्याच्या योजना कार्यान्वित आहेत. वेळीच आवर्तन सुटले नाही तर या परिसरातील पिण्याच्या पाण्याची समस्या जटिल होऊ शकते.

निमोणे, गुणाट, न्हावरे, निर्वी, आंधळगाव आदी परिसरात देखील पाण्यासाठी शेतकरी आग्रही असून, लवकरात लवकर कालवा सल्लागार समितीची बैठक घेऊन तातडीने टेल टू हेड या स्वरूपात आवर्तन सोडण्यात यावे. आवर्तनाला उशीर झाला तर पाण्यासाठी अनेक ठिकाणी कालवा फोडाफोडीचा प्रकार यापूर्वी घडला आहे. त्यामुळे विलंब न करता प्रशासनाने तातडीने आवर्तनाचे नियोजन करावे, अशी मागणी वृषाली वाळके यांनी केली आहे.

### विद्यानगर ग्रीन पार्क सोसायटीमध्ये डॉ. आंबेडकर जयंती साजरी

जेजुरी (दै. संध्या)

जेजुरी नगरपरिषदचे नगराध्यक्ष जयदीप बारभाई, खाटीक समाज प्रदेशाध्यक्ष मनीष निकुडे , भारतीय जनता पार्टी पुणे जिल्हा चिटणीस गणेश भोसले, नगरसेवक योगेश जगताप, नगरसेविका भक्ती कोरपड तसेच उद्योजक अमोल जगताप यांनी डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन करून अभिवादन केले.

उपस्थितांनी डॉ बाबासाहेबांच्या विचारांचे महत्त्व, शिक्षणाचे सामर्थ्य आणि सामाजिक समतेचा संदेश आपल्या मनोगतातून मांडला.

### नीरेत डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती उत्साहात साजरी

नीरा (दै. संध्या)

भारतरत्न, महामानव, भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची १३५ वी जयंती मंगळवारी (दि.१४) मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. नीरा ग्रामपंचायत, अखिल भिमजयंती उत्सव समिती, नीरा यांच्या वतीने डॉ.बाबासाहेब आंबेडकरांना अभिवादन करण्यात आले. तसेच डॉ.बाबासाहेब आंबेडकर चौकातील डॉ.आंबेडकर यांच्या चवदार तळ्याच्या सत्याग्रहाच्या शिल्पाचे लोकार्पण करण्यात आले.

नीरा (ता.पुरंदर) येथील ग्रामपंचायतीमध्ये माजी सरपंच तेजश्री काकडे व मान्यवरांच्या हस्ते डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. तसेच नीरा ग्रामपंचायतीच्यावतीने पालखी तळासमोरील डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौकात उभारलेल्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या चवदार तळ्याच्या सत्याग्राच्या शिल्पाचे लोकार्पण जि.प.चे माजी बांधकाम सभापती प्रमोद काकडे व माजी सरपंच तेजश्री काकडे व उपस्थित मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले.

अखिल भिमजयंती उत्सव समिती, नीरा यांच्या वतीने सर्वोदय सोसायटीत डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस माजी सरपंच तेजश्री काकडे व पं. स. सदस्या मोनिका कांबळे व जिल्हा परिषद सदस्य प्राजक्ता दुर्गाडे यांच्या उपस्थित मान्यवरांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

### डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती मोठ्या उत्साहात

उरुळी कांचन (दै. संध्या)



उरुळी कांचन (ता. हवेली) येथे भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती मोठ्या उत्साहात,भक्तिभावाने आणि सामाजिक बांधिलकीच्या भावनेत साजरी करण्यात आली.दत्तवाडी, सटवाई चौक,उरुळी कांचन पोलीस स्टेशन तसेच उरुळी कांचन ग्रामपंचायत, येथे जयंती मोठ्या उत्साहात करण्यात आली.

उरुळी कांचन पोलीस स्टेशन येथे जयंतीनिमित्त विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. पोलीस निरीक्षक सचिन वांगडे यांच्या हस्ते डॉ. आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. यावेळी पोलीस कर्मचारी आणि होमगार्ड मोठ्या संख्येने उपस्थित होते. पोलीस दलाकडूनही मोठ्या आदराने जयंती साजरी करण्यात आली.

सर्व ठिकाणी कार्यक्रमाची सुरुवात डॉ. आंबेडकर यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून करण्यात आली. उपस्थित मान्यवरांनी कृतज्ञतापूर्वक अभिवादन करत "ज्ञान, समता आणि बंधुता" या त्यांच्या विचारांचा जागर केला. जयंतीनिमित्त परिसरात उत्साहाचे आणि अभिमानाचे वातावरण निर्माण झाले होते. या जयंती सोहळ्यात युवकांनी मोठ्या उत्साहाने सहभाग घेतला. "जयभीम"च्या घोषणांनी संपूर्ण परिसर दुमदुमून गेला. लहान मुलांपासून ते ज्येष्ठ नागरिकांपर्यंत सर्वांनीच उत्स्फूर्त सहभाग नोंदवला. कार्यक्रमाचे आयोजन अत्यंत शिस्तबद्ध पद्धतीने करण्यात आले होते. स्वयंसेवकांनी उत्कृष्ट नियोजन करत सर्व व्यवस्था सुरळीत पार पाडली. या कार्यक्रमाला समाजसेवक अनिल कदम, वंचित बहुजन आघाडी पुणे जिल्ह्याचे महासचिव सतीश साळवे, काका गाडे, मुकेश बडेकर, संदीप बडेकर, मल्हारी बडेकर, निवृत्त पोलीस अधिकारी कदम तसेच अनेक मान्यवर ग्रामस्थांनी सहभाग घेतला. तसेच उरुळी कांचन पोलीस स्टेशनचे पो. हवा सलीम शेख, शैलेश लोखंडे, पो. कॉ. काजल सानप आणि महिला होमगार्ड पीटे यांनी कार्यक्रमादरम्यान चोख बंदोबस्त ठेवला.

उरुळी कांचनमध्ये पार पडलेला हा जयंती सोहळा केवळ औपचारिक कार्यक्रम न राहता समाजप्रबोधन, एकता आणि प्रेरणेचा संदेश देणारा ठरला.

### महापुरुषांच्या विचारांची जयंती साजरी व्हावी - प्रा. दुर्गाडे

वाल्हे (दै. संध्या)

सिकंदर नदाफ

देशात वेगवेगळे धर्म, जाती,पोटजाती असून अनेक भाषा बोलल्या जातात तसेच सण उत्सव देखील गुण्यागोविंदाने साजरे केले जातात परंतु या सर्वांना एकत्र जोडण्याचे काम महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या संविधानामुळे शक्य झाले आहे. महापुरुषांनी केलेले महान कार्यआजच्या पिढीपर्यंत पोहचण्यासाठी महापुरुषांची जयंती डीजेच्या तालावर नव्हे तर त्यांचे विचार वाचून साजरी करायला हवी असे मत पुणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे अध्यक्ष प्रा.दिगंबर दुर्गाडे यांनी व्यक्त केले.

वाल्हे ( ता. पुरंदर ) येथील सिद्धार्थ नगरमध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा जन्मोत्सव उत्साहात साजरा करण्यात आला यावेळी आयोजित कार्यक्रमात प्रा. दिगंबर दुर्गाडे हे बोलत होते.

या प्रसंगी वाल्हे गावचे सरपंच अतुल गायकवाड जिल्हा परिषदेच्या सदस्या प्राजक्ता दुर्गाडे उपसरपंच सागर भुजबळ आरपीआयचे अध्यक्ष शैलेंद्र भोसले माथाडी कामगार संघटनेचे तालुकाध्यक्ष निलेश पवार शिवसेनेचे रोहित भोसले तसेच संभाजी पवार सुनील पवार दीपक कुमठेकर सत्यवान सूर्यवंशी सतीश पवार निलेश भोसले आदी मान्यवर उपस्थित होते.

### आघाव दाम्पत्यांस डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मृती गौरव पुरस्कार जाहीर

चाकण (दै. संध्या)

शिक्षण क्षेत्रातील अतुलनीय कामगिरीबद्दल येथील संतोष ऑल राऊंडर अकॅडमी, सारा अबॅकस अकॅडमी आणि विश्वशांतीनिकेतन विद्यालय गुरुकुलचे संचालक डॉ. प्रविण आघाव व प्राचार्या अर्चना प्रविण आघाव यांना त्रेतायुग फाउंडेशनच्या वतीने डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मृती गौरव पुरस्कार - २०२६ जाहीर झाला आहे.

अयोध्या धाम, उत्तर प्रदेश येथे शुक्रवारी (दि.२४) होणाऱ्या एका भरगच्च कार्यक्रमात डॉ. आघाव दाम्पत्यांस हा पुरस्कार देऊन गौरविण्यात येणार आहे. सुंदर हस्ताक्षर, वैदिक गणित, रोबोटिक्स, रुबीक क्यूब, व्याकरण, चित्रकला, मराठी व इंग्रजी वाचनाचा क्लास, मेंदू कल चाचणी, अबॅकस, स्पोकन इंग्रजी या शालेयत्तर विविध प्रकारचे उपक्रम आघाव दांपत्य यशस्वीपणे राबवत आहेत.

### बारामती शहर कॉंग्रेस युवक प्रभारी अध्यक्षपदी सोनवणे

बारामती (दै. संध्या)




बारामती येथे संघटन सृजन अभियान अंतर्गत पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांचा मेळावा उत्साहपुर्ण वातावरणात संपन्न झाला.भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेसने देशभरात संघटन सृजन अभियान हाती घेतले असून,महाराष्ट्रात हे अभियान पक्षाला तळागाळापर्यंत मजबूत करण्यासाठी एक महत्त्वपूर्ण पाऊल ठरणार आहे.याचाच एक भाग म्हणून बारामती शहर कॉंग्रेस युवक प्रभारी अध्यक्ष पदी सुशांत सोनवणे यांची निवड पुणे जिल्हा युवक कॉंग्रेसचे अध्यक्ष उमेश पवार यांच्या सुचनेनुसार करण्यात आली.यावेळी अखिल भारतीय कॉंग्रेसचे निरिक्षक योगेश एस.सी., महाराष्ट्र कॉंग्रेसचे निरिक्षक प्रशांत जगताप,पुणे जिल्हाध्यक्ष श्रीरंग चव्हाण,महाराष्ट्र प्रदेश युवक कॉंग्रेस कमिटी सचिव विश्वजित हप्ते,बारामती शहराध्यक्ष अशोक इंगुले, महाराष्ट्र प्रदेश कॉंग्रेस कमिटी सचिव आकाश मोरे,महाराष्ट्र प्रदेश युवक सचिव विरधवल गाडे,बारामती विधानसभा अध्यक्ष वैभव बुरुंगले, राजेंद्र गायकवाड,सौरभ रुपनवर,सिद्धेश गवळी,सुरज भोसले,रोहित बनकर,अॅड.तुषार ओव्हाळ,निलेश गजरमल,भारत रामचंद्रे इत्यादी बहुसंख्य कॉंग्रेस कार्यकर्ते यावेळी उपस्थित होते.

# उंड्री-मोहम्मदवाडीत पाण्याचा तीव्र तुटवडा

## 40 एमएलडी टाक्या 7 वर्षांपासून कोरड्या; पाइपलाइन रखडल्याने नागरिकांचा संताप, टँकर खर्चाने कंबरडे मोडले

उंड्री (दै. संध्या)



महंमदवाडी-उंड्री आणि कोंढवा परिसरातील सुमारे साडेआठ लाख नागरिकांना अद्यापही महापालिकेच्या पाण्याची प्रतीक्षा करावी लागत आहे. या भागांत आजही नागरिकांना महापालिकेकडून एक थेंबही पाणी मिळत नसल्याची गंभीर स्थिती आहे. विशेष म्हणजे कोट्यवधी रुपयांचा खर्च करून उभारण्यात आलेल्या 40 एमएलडी (चार कोटी लीटर) क्षमतेच्या पाण्याच्या टाक्या पूर्ण होऊनही गेल्या सात वर्षांपासून त्या कोरड्याच पडून आहेत.

या भागाचा महापालिकेत समावेश होऊन तब्बल 15 वर्षे उलटली असतानाही नियमित पाणीपुरवठा सुरू झालेला नाही. त्यामुळे नागरिकांमध्ये तीव नाराजी असून, त्यांनी वारंवार निवेदने देत आंदोलनाचा मार्ग अवलंबला आहे. मात्र, प्रशासनाकडून ठोस कारवाई होत नसल्याची तक्रार आहे. महापालिकेच्या म्हणण्यानुसार, दोन ठिकाणी प्रत्येकी सुमारे 300 मीटर पाइपलाइनचे काम शिल्लक आहे. हे काम पूर्ण झाल्यानंतर आठही पाण्याच्या टाक्यांमध्ये पाणी पोहोचू शकते. याशिवाय, कात्रज-कोंढवा रस्त्यावर 125 मीटर जागेचा प्रश्न अद्याप निकाली न लागल्याने अडथळा निर्माण झाला आहे. संबंधित ठिकाणी बांधकाम आणि जागेच्या ताब्याच्या अडचणींमुळे भूमिगत पाइपलाइन टाकण्यास अडथळे येत असल्याचे प्रशासनाने स्पष्ट केले आहे.

दरम्यान, काही नागरिकांनी या विलंबामागे टँकर माफियांचा हस्तक्षेप असल्याचा गंभीर आरोप केला आहे. नियमित पाणीपुरवठा सुरू झाल्यास टँकर व्यवसायावर परिणाम होईल, या भीतीने पाइपलाइन कामात अप्रत्यक्ष अडथळे आणले जात असल्याचा संशय व्यक्त केला जात आहे. काही सोसायट्यांवर खासगी टँकरचे पाणी घेण्यासाठी दबाव टाकला जात असल्याचाही दावा करण्यात आला आहे. त्यामुळे या प्रकरणाची सखोल चौकशी करण्याची मागणी नागरिकांनी केली आहे.

शहराच्या वाढत्या उपनगरांमध्ये मोठ्या प्रमाणावर बांधकामांना परवानगी देताना विकसकांनी पाणीपुरवठ्याची हमी दिली होती. मात्र, प्रत्यक्षात ती पूर्ण न झाल्याने रहिवाशांना खासगी टँकरवर अवलंबून राहावे लागत आहे. महंमदवाडी-उंड्री भागात टाक्या उभ्या असल्या, तरी त्या कोरड्या असल्याने नागरिकांमध्ये असंतोष वाढला आहे.

## थोडक्यात पण महत्वाचे...



### प्राचार्य संदिप टिळेकर यांचा सन्मान, रोटरी क्लब ऑफ पुरंदरच्या अध्यक्षपदी निवड

पुरंदर (दैनिक संध्या) : पुरंदर तालुक्यातील शैक्षणिक व सामाजिक क्षेत्रात कार्यरत असलेले आचार्य अत्रे प्रतिष्ठानचे सहसचिव तसेच गुरुकुल करिअर अकादमीचे संस्थापक अध्यक्ष प्राचार्य संदिप टिळेकर यांची रोटरी क्लब ऑफ पुरंदरच्या अध्यक्षपदी निवड झाल्याबद्दल त्यांचा सत्कार करण्यात आला. पुणे जिल्हा परिषद माध्यमिक शिक्षण विभागाचे शिक्षणाधिकारी डॉ. भाऊसाहेब कारेकर यांच्या हस्ते शाल व पुष्पगुच्छ देऊन टिळेकर यांचा गौरव करण्यात आला. यावेळी त्यांच्या शैक्षणिक व सामाजिक क्षेत्रातील कार्याचा गौरव करण्यात येत, भावी कार्यासाठी शुभेच्छा देण्यात आल्या. या कार्यक्रमास महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक मुख्याध्यापक महामंडळाचे सचिव व राष्ट्रपती पुरस्कार प्राप्त आदर्श प्राचार्य नंदकुमार सागर, राष्ट्रपती पुरस्कार प्राप्त कुंडलिक मेमाणे, मुख्याध्यापक हनुमंत पवार तसेच पुरंदर तालुका माध्यमिक शिक्षक संघाचे अध्यक्ष दत्तात्रय रोकडे यांची प्रमुख उपस्थिती होती. उपस्थित मान्यवरांनी टिळेकर यांच्या कार्याची प्रशंसा करत त्यांच्या नेतृत्वातून सामाजिक व शैक्षणिक क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी होईल, असा विश्वास व्यक्त केला.



### बारामती-निरा रस्त्यावर झाडांची कत्तल; वारीत वारकऱ्यांना उन्हाचा फटका

बारामती: (दैनिक संध्या) विकासाच्या प्रक्रियेत रस्ते मोठे होणे आता काळाची गरज बनली आहे. बारामती तालुक्यातील सर्वाधिक वर्दळीचा रस्ता म्हणून बारामती-निरा रस्ता ओळखला जातो. या रस्त्याचे गेल्या काही वर्षांपासून टप्प्याटप्प्याने रुंदीकरण सुरू आहे. त्यासाठी शेकडो वर्षे जुनी वड, पिंपळ, चिंच यांसारखी हजारो झाडे तोडली गेली आहेत. परिणामी हा रस्ता बकाल बनला आहे. यंदाच्या वारीलाही त्याचा फटका बसणार असून, रखरखत्या वाटेवरून चालणे वारकऱ्यांसाठी जिकीरीचे बनणार आहे. आषाढी वारीचा सोहळा अवघ्या काही महिन्यांवर येऊन ठेपला असताना, यंदा वारकऱ्यांना रखरखत्या उन्हातच पायीवारी करावी लागणार आहे. बारामती-निरा राज्य मार्गाच्या चौपदरीकरणाच्या कामामुळे हजारो झाडांची कत्तल झाल्याने पालखी मार्गावर सावलीचा पूर्णतः अभाव जाणवत आहे. दरवर्षी संत सोपानदेव पालखी सोहळा बारामती तालुक्यातून पंढरपूरकडे मार्गस्थ होतो. मात्र, यंदा मार्गावरील झाडांची तोड आणि अपूर्ण कामांमुळे वारकऱ्यांना मोठ्या अडचणींना सामोरे जावे लागणार आहे. हवामान विभागानेही यंदा पावसाचे प्रमाण कमी राहण्याचा अंदाज व्यक्त केल्याने वारकऱ्यांची चिंता वाढली आहे. रस्त्याच्या रुंदीकरणासाठी जुन्या व मोठ्या सावलीच्या झाडांची मोठ्या प्रमाणावर कत्तल करण्यात आली. पूर्वी वड, पिंपळ, जांभूळ, लिंब यांसारखी दाट सावली देणारी झाडे वारकऱ्यांसाठी आधार ठरत होती. या झाडांच्या सावलीत वारकरी विसावा घेत पुढील प्रवासाला निघत असत. मात्र, गेल्या दोन-तीन वर्षांपासून सुरू असलेल्या कामांमुळे हा मार्ग आता पूर्णतः उजाड आणि भकास झाला आहे. प्रशासनाकडून वृक्षारोपण करण्यात आले असले, तरी झाडे जिवंत ठेवण्यासाठी आवश्यक उपाययोजना न झाल्याने अनेक रोपे वाळून गेली आहेत. या मार्गावर पुन्हा दाट सावली निर्माण होण्यासाठी किमान 10 वर्षांचा कालावधी लागणार आहे.

### पुण्यात नऱ्हेत कोयत्याच्या धाकाने 4 लाखांची लूट

पुणे: (दैनिक संध्या) मद्यविक्री दुकानात काम करणाऱ्या तरुणाला कोयत्याचा धाक दाखवून चार लाख रुपयांची रोकड लुटण्यात आली. ही घटना मुंबई-बंगळुरू बाह्यवळण मार्गावर नऱ्हे परिसरात घडली. याप्रकरणी दुचाकीस्वार चोरट्यांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला. याबाबत रोहन रवींद्र कांबळे (वय 31, रा. इंदू निवास, काळेवाडी, पिंपरी-चिंचवड) याने नऱ्हे पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे. त्याने दिलेल्या फिर्यादीनुसार, दुचाकीस्वार चोरटा आणि त्याच्याबरोबर असलेल्या साथीदाराविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, रोहन एका मद्यविक्री दुकानात कामाला आहे. मद्यविक्री दुकानात जमा झालेली तीन लाख 99 हजार रुपयांची रोकड घेऊन तो 12 एप्रिल रोजी रात्री बाराच्या सुमारास मालकांच्या घरी देण्यासाठी निघाला होता. मुंबई-बंगळुरू बाह्यवळण मार्गावर नऱ्हे परिसरात दुचाकीस्वार कांबळे याला दुचाकीवरून आलेल्या दोघांनी अडवले. त्याला कोयत्याचा धाक दाखविला. त्याला जीवे मारण्याची धमकी देऊन तीन लाख 99 हजार रुपयांची रोकड असलेली पिशवी हिसकावून चोरटे पसार झाले. या घटनेनंतर कांबळेने पोलिसांकडे तक्रार दिली. या घटनेची माहिती मिळताच सहायक पोलिस आयुक्त अजय परमार, वरिष्ठ पोलिस निरीक्षक आसाराम शेटे यांनी घटनास्थळी भेट दिली. पसार झालेल्या चोरट्यांचा माग काढण्यात येत असून, पोलिसांनी बाह्यवळण मार्गावरील सीसीटीव्ही चित्रीकरण तपासले आहे. पोलिस उपनिरीक्षक लिटे तपास करत आहेत.

### मंचरमध्ये बनावट सोन्याच्या आमिषाने फसवणूक; सहा जण अटकेत

मंचर : (दैनिक संध्या) वयोवृद्ध महिला व पुरुषांची बनावट सोन्याच्या बिस्किटांच्या आमिषाने फसवणूक करणाऱ्या टोळीला मंचर पोलिसांनी अटक केली. या कारवाईत सोन्याचे दागिने व गुन्ह्यात वापरलेली कार असा एकूण 3 लाख 93 हजार 193 रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. मंचर ठाण्याच्या हद्दीत गेली काही दिवसांपासून वृद्ध नागरिकांना बनावट सोन्याची बिस्किटे दाखवून आरोपी वृद्धांकडील सोन्याचे दागिने काढून घेत फसवणूक करीत होते. याबाबत मंचर ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता. वरिष्ठ पोलिस निरीक्षक श्रीकांत कंकाळ यांच्या मार्गदर्शनाखाली तपास सुरू होता. कळंब (ता. आंबेगाव) येथील एका हॉटेलजवळ संशयास्पद कार (एमएच 12 केएन 3898) पोलिसांना आढळली. त्यात सहाजण होते. चौकशीत त्यांनी उडवाउडवीची उत्तरे दिल्याने पोलिसांनी त्यांची कसून चौकशी केली. त्यात त्यांनी गुन्ह्याची कबुली दिली. आरोपींची नावे पुढीलप्रमाणे - गणेश विनायक गायकवाड (वय 37, रा. भालगाव, ता. पाथर्डी), बंडू लक्ष्मण जाधव (वय 48, रा. गांधीनगर, जि. बीड), मनोहर भाऊसाहेब जाधव (वय 35, रा. एकनाथवाडी, ता. पाथर्डी), खंडू बंडू जाधव (वय 20, रा. गांधीनगर), सतीश रस्तूम पवार (वय 33, रा.गांधीनगर),

# एफआरपी थकीत; कारखान्यांचे 30 एप्रिलपर्यंत देण्याचे आश्वासन

## उस उत्पादकांचे 1012 कोटी रुपये थकीत; पुढील सुनावणी 7 मे रोजी

पुणे (दै. संध्या)

घाऊक बाजारात साखरेचे दर मंदीत आहेत, इथेनॉलला अपेक्षित उठाव नाही. त्यामुळे उसाची रास्त आणि किफायतशीर किंमतीची (एफआरपी) देय रक्कम शेतकऱ्यांना देण्यात अडचण येत असल्याबाबतचे गाऱ्हाण्यांचे गुऱ्हाळ उपस्थित कारखान्यांच्या प्रतिनिधींनी साखर संचालकांसमोर सुरुच ठेवल्याचे पुन्हा एकदा स्पष्ट झाले आहे.




त्यामुळे आम्ही शेतकऱ्यांना 30 एप्रिलपर्यंत उर्वरित थकीत एफआरपीची रक्कम देऊ, असे रडगाण्याची भूमिका कारखान्यांनी घेतली असून, साखर आयुक्तालयाने या बाबतची पुढील सुनावणी आता 7 मे रोजी साखर संकुल येथे ठेवली असल्याची माहिती अधिकाऱ्यांनी दिली.

शेतकऱ्यांना 29 कारखान्यांकडून देय असलेल्या एफआरपीची एकूण रक्कम 3074 कोटी 33 लाख रुपये होती. त्यापैकी कारखान्यांनी शेतकऱ्यांच्या बँक खात्यावर 2061 कोटी 89 लाख रुपये जमा केलेले आहेत. तर प्रत्यक्षात 1012 कोटी 44 लाख रुपये अद्यापही देणे बाकी आहे.

त्यासाठी साखर आयुक्तालयात सोमवारी (दि. 13) दिनांक 31 मार्च 2026 अखेरच्या अहवालानुसार थकीत रकमेपैकी ज्या कारखान्यांनी 80 टक्क्यांपेक्षा एफआरपीची कमी रक्कम शेतकऱ्यांना दिलेली आहे, अशाच 29 कारखान्यांच्या सुनावण्या घेण्यात आल्या. त्याला 24 कारखान्यांचे प्रतिनिधी हजर होते. साखर संचालक (अर्थ) यशवंत गिरी यांच्यासमोर या सुनावण्या झाल्या. गैरहजर राहणाऱ्या कारखान्यांना सुनावणीची पुढील नोटीस काढली जाण्याची अपेक्षा असल्याची माहितीही अधिकाऱ्यांनी दिली.

### कारखान्यांनी मांडलेल्या अडचणींच्या व्यथा व उपाययोजनाही

केंद्र सरकारकडे अतिरिक्त कोट्याद्वारे कारखान्यांकडील साखर विक्रीस परवानगीचा प्रस्ताव प्रलंबित आहे. तो मंजूर झाल्यास जादा साखर विक्री करून एफआरपीची रक्कम देऊ. एफआरपीची रक्कम देण्यासाठी काही खासगी बँका आणि जिल्हा बँकांकडे कारखान्यांच्या प्रस्तावावरील निर्णय प्रलंबित आहे. तो मंजूर झाल्यासही रक्कम देण्याचा मार्ग मोकळा होईल. इथेनॉल उत्पादन अधिक होऊनही अपेक्षित उठाव ऑईल कंपन्यांकडून नसल्याने कारखान्यांची रक्कम खुली होण्यास अडचणी येत आहेत. बाजारात साखरेस अपेक्षित मागणी नसल्याने दर पडलेलेच आहेत. त्यामुळेही एफआरपीची रक्कम देण्यास अडचणी येत आहेत. तरीसुद्धा व्यवस्था झाल्यास आम्ही दिनांक 30 एप्रिलपर्यंत उर्वरित थकीत एफआरपीची रक्कम देऊ, असेही कारखाना प्रतिनिधींनी स्पष्ट केले आहे.

# नारी शक्ती : मूलभूत सन्मानापासून स्वतःचे अवकाश

**आर. विमला (भा. प्र. से.) सचिव तथा निवासी आयुक्त, महाराष्ट्र सदन**

भारतातील एखाद्या गावातील तिशीतली स्त्री डोळ्यासमोर आणा. काही वर्षांपूर्वी ती पहाटे अंधारात, भीतीच्या छायेत घराबाहेर जाऊन नैसर्गिक विधी आटोपत असे. घरातील सर्वांसाठी पाणी दूरवरून आणणे, लाकडाच्या धुरात स्वयंपाक करणे, स्वतःच्या नावावर घर नसणे, बँक खाते नसणे—अशा अनेक मर्यादांमध्ये तिचे आयुष्य अडकलेले होते. पण आज ही परिस्थिती बदलली आहे. या परिवर्तनाला नाव आहे—“नारी शक्ती”. गेल्या काही वर्षांत महिलांच्या जीवनातील प्रत्येक पैलू एकमेकांशी जोडून बदल घडविण्याचा प्रयत्न झाला आहे. महिलांच्या सन्मानाची सुरुवात मूलभूत गरजांपासून झाली. स्वच्छ भारत अभियानातून कोट्यवधी शौचालयांची निर्मिती झाली आणि ग्रामीण भारत खुले शौचालयमुक्त झाला. यामुळे महिलांची सुरक्षितता वाढली. जल जीवन मिशनमुळे घराघरात नळजोडणी झाली आणि पाण्यासाठी होणारी दररोजची कसरत कमी झाली. उज्ज्वला योजनेतून

■ "स्त्रियांना फक्त गृहिणी म्हणून पाहण्याचे दिवस गेले; आता त्यांना राष्ट्रनिर्माते म्हणून पाहण्याची गरज आहे." : पंतप्रधान श्री नरेंद्र मोदी

महिलांच्या नावावर गॅस कनेक्शन मिळाले, धुरामुळे होणारे आरोग्याचे त्रास कमी झाले. प्रधानमंत्री आवास योजनेत महिलांच्या नावावर घरे देण्यात आली, ज्यामुळे त्यांना मालकी हक्क आणि आर्थिक सुरक्षितता मिळाली.

शौचालय, पाणी, इंधन आणि घर, हे केवळ योजना नसून सन्मान पुनर्स्थापित करण्याचा एकत्रित प्रयत्न आहे. महिलांच्या सक्षमीकरणाची सुरुवात जन्मापूर्वीपासूनच होते. पोषण अभियान (POSHAN 2.0) बालकांच्या पहिल्या 1000 दिवसांवर लक्ष केंद्रित करते. प्रधानमंत्री मातृ वंदना योजनेतून मातांना थेट आर्थिक मदत मिळते. सुरक्षित मातृत्व आश्वासन ‘सुमन’ योजना राबविण्यात आली आहे. तसेच प्रधानमंत्री सुरक्षा विमा योजना आणि जीवन ज्योती विमा योजना यामुळे महिलांना आर्थिक संरक्षण मिळाले. ‘बेटी बचाओ, बेटी पढाओ’मुळे मुलींच्या जन्मदरात सुधारणा झाली, तर ‘सुकन्या समृद्धी’ योजनेमुळे मुलींचे भविष्य सुरक्षित झाले. आर्थिक स्वावलंबन हा सक्षमीकरणाचा कणा आहे. जनधन योजनेमुळे कोट्यवधी महिलांना बँकिंग व्यवस्थेशी जोडले गेले. मुद्रा योजनेत महिलांना मोठ्या प्रमाणावर कर्ज मिळाले. स्वयं-सहायता गटांच्या माध्यमातून महिलांनी उद्योग, व्यवसाय सुरू केले. ‘लखपती दीदी’ ही संकल्पना ग्रामीण महिलांसाठी प्रेरणादायी ठरली आहे. ‘नमो ड्रोन दीदी’सारख्या उपक्रमातून महिलांना आधुनिक तंत्रज्ञानाचे प्रशिक्षण दिले जात आहे. महिलांच्या सुरक्षिततेसाठी ‘मिशन शक्ती’ अंतर्गत सखी वन-स्टॉप केंद्रे सुरू करण्यात आली आहेत, जिथे कायदेशीर, वैद्यकीय आणि समुपदेशन सेवा एकाच ठिकाणी मिळतात. महिला हेल्पलाईन, निर्भया निधी आणि इतर उपक्रमांनी सुरक्षा यंत्रणा अधिक मजबूत केली आहे. तात्काळ तीन तलाक बंदी हा महिलांच्या अधिकारांसाठी एक महत्त्वाचा टप्पा ठरला. आज भारतीय महिला प्रत्येक क्षेत्रात यशस्वी होत आहेत. अवकाश संशोधनापासून संरक्षण क्षेत्रापर्यंत त्यांनी आपली छाप पाडली आहे. महिला आता केवळ सहभागी नाहीत, तर नेतृत्वही करत आहेत. STEM क्षेत्रातही महिलांची संख्या वाढत आहे.

‘नारी शक्ती वंदन अधिनियम’ हा महिलांच्या राजकीय सक्षमीकरणाचा ऐतिहासिक निर्णय आहे. लोकसभा आणि विधानसभांमध्ये महिलांना 33% आरक्षण देण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.

# आधी गोळीबार, मग कोयत्याने वार; क्रूरतेचा कळस गाठत ठेचून हत्या

लोहगाव (दै. संध्या)

शहरात सर्वत्र डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंतीचा उत्साह असतानाच, विश्रांतवाडी येथील कॉमर्स झोन परिसरात मंगळवारी मध्यरात्री एका १८ वर्षीय तरुणाची अत्यंत क्रूरपणे हत्या करण्यात आली. या घटनेमुळे परिसरात मोठी खळबळ उडाली असून नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण पसरले आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, गौरव गणेश तेलंगी (वय १८, रा. सिंहगड रोड) असे मृत तरुणाचे नाव आहे. मंगळवारी रात्री ११:३० ते १२:३० च्या सुमारास ही घटना घडली. गौरववर तौफिक शेख आणि त्याच्या काही साथीदारांनी जीवघेणा हल्ला केला. प्राथमिक तपासात हा प्रकार जुन्या वादातून घडल्याचे समोर येत आहे.

हल्लेखोरांनी सुरुवातीला गौरववर गोळीबार करून त्याला ठार मारण्याचा प्रयत्न केला, मात्र गोळीचा नेम चुकला. त्यानंतर संतापलेल्या आरोपींनी धारदार कोयत्याने गौरववर सपासप वार केले. इतक्यावरच न थांबता, आरोपींनी क्रूरतेचा कळस गाठत जवळच पडलेले दगड आणि विटांनी गौरवच्या डोक्यावर प्रहार करून त्याला जागीच ठेचून काढले. या अमानुष हल्ल्यात गौरवचा जागीच मृत्यू झाला.

या निर्घृण हत्येमुळे कॉमर्स झोन परिसरात काही काळ दहशतीचे वातावरण निर्माण झाले होते. घटनेची भीषणता इतकी होती की, परिसरातील नागरिकांनी भीतीपोटी घराबाहेर पडणे टाळले. घटनेची माहिती मिळताच विश्रांतवाडी पोलिसांनी तातडीने धाव घेऊन घटनास्थळाचा पंचनामा केला आणि मृतदेह शवविच्छेदनासाठी पाठवला.

# मनोरुग्णालय गैरप्रकार; अपयश झाकण्यासाठी कंत्राटदार टार्गेट?

लोहगाव (दै. संध्या)

प्रादेशिक मनोरुग्णालयात रुग्णांकडून शौचालये साफ करून घेतल्याचा, त्यांच्याकडून मेहनतीची कामे करून घेण्याचा धक्कादायक प्रकार समोर आल्यानंतर आता या प्रकरणाला नवे वळण लागले आहे. आरोग्य विभागाने या प्रकरणाच्या चौकशीसाठी डॉ. सुप्रिया देशमुख यांच्या नेतृत्वाखाली त्रिसदस्यीय समिती स्थापन केली आहे. या प्रकरणी अधीक्षक कामचुकार कर्मचाऱ्यांना पाठीशी घालून स्वत:च्या झालेल्या चुका, दुर्लक्ष मान्य न करता कंत्राटदारावर खापर फोडताना दिसत आहे. प्रत्यक्षात अधीक्षकाने दिलेली नोटीस व कंत्राटदाराने दिलेले उत्तर आणि रुग्णालयाची थकीत देयके पाहता, अधीक्षक स्वतःचे दोष झाकण्यात मग्न असल्याचे चित्र रुग्णालय परिसरात दिसत आहे.

'लोकराज्य स्वयंरोजगार सेवा सहकारी संस्थेला' गेल्या १९ महिन्यांपासून त्यांच्या हक्काचे बिल मिळालेले नाही. सुमारे २ कोटी ६८ लाख रुपयांची ही मोठी रक्कम थकल्यामुळे कंत्राटदाराने १ एप्रिल २०२६ पासून काम बंद केले होते. कंत्राटदाराने वारंवार निवेदने देऊनही बिले अदा केले नाही. उलट त्यांना धमकावण्यात आल्याचा खळबळजनक आरोप कंत्राटदाराने उत्तरादाखल दिलेल्या पत्राद्वारे केला आहे.

# खडकवासला कालव्यातील अतिक्रमण हटवण्यासाठी 50 उपअभियंते तैनात

## खडकवासला ते फुरसुंगी कालव्यातील अतिक्रमण हटवण्यासाठी जलसंपदा विभागाची मोहीम वेगात

खडकवासला (दै. संध्या)

खडकवासला धरणाच्या परिसराबरोबरच फुरसुंगीपर्यंतच्या मुठा उजवा कालव्यातील अतिक्रमणे काढण्यासाठी जलसंपदा विभागाने आता अतिरिक्त 50 उपअभियंते तैनात केले आहेत. कालव्याच्या प्रत्येक पाच किलोमीटरसाठी चार अभियंते या मोहिमेत नेमण्यात आले आहेत. तसेच, कालव्याच्या परिसरातील झोपडपट्ट्यांची अतिक्रमणे काढल्यानंतर या ठिकाणी सीमाभिंत उभारण्यात येईल, अशी माहिती जलसंपदामंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी दिली. दरम्यान, धरण परिसरातील 100 अतिक्रमणे काढण्यात आली असून, कालव्यावरील 25 हेक्टरपैकी पाच हेक्टर क्षेत्र अतिक्रमणमुक्त करण्यात आल्याची माहिती विभागाकडून देण्यात आली.

खडकवासला धरण परिसरात वाढत्या अतिक्रमणांबाबत तक्रारी आल्यानंतर जलसंपदामंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी याची गंभीर दखल घेतली आहे. ही अतिक्रमणे तातडीने काढावीत, असे आदेश त्यांनी जलसंपदा विभागाला दिले होते. गेल्या काही महिन्यांपासून अतिक्रमण हटावची मोहीम सुरू आहे.

विखे पाटील यांनी महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळाच्या नियामक मंडळाची बैठक घेतली. त्यानंतर त्यांनी पत्रकारांशी संवाद साधला. या वेळी खडकवासला धरणातील अतिक्रमणांबाबत विचारले असता त्यांनी अतिक्रमणे काढून ही जमीन ताब्यात घेणार असल्याचे स्पष्ट केले. खडकवासला धरणातून फुरसुंगीपर्यंत असलेला कालवा शहरातून जात असल्याने या ठिकाणी अतिक्रमणांची संख्या जास्त आहे. त्यात झोपडपट्ट्यांची संख्या जास्त असल्याने ते काढणे आव्हानात्मक असल्याचे त्यांनी कबूल केले.

मात्र, या सर्व झोपडपट्ट्यांना नोटिसा बजावण्यात आल्या असून, ही सर्व अतिक्रमणे काढण्यात येईल, असे त्यांनी स्पष्ट केले. त्यासाठी जलसंपदा विभागातील 50 उपअभियंत्यांना या मोहिमेत सामील करून घेण्यात आले आहे. अतिक्रमणे काढण्यासाठी प्रत्येक पाच किलोमीटरमागे चार उपअभियंते या मोहिमेत सहभागी असतील, असेही त्यांनी स्पष्ट केले. अतिक्रमणे काढल्यानंतर या ठिकाणी सीमाभिंत उभारण्यात येईल, असेही ते या वेळी म्हणाले. जलसंपदा विभागाने अतिक्रमणे काढण्यासाठी ड्रोन सर्व्हे करण्यात आला. अतिक्रमणांमध्ये रिसॉर्ट हॉटेल तसेच घरांचाही समावेश असल्याचे या ड्रोन सर्व्हेमधून स्पष्ट झाले होते. गेल्या काही महिन्यांपासून ही अतिक्रमण हटाव मोहीम सुरू असून, आतापर्यंत धरण परिसरातील 90 टक्के अतिक्रमणे काढण्यात आली आहेत. तर, कालव्याच्या परिसरात असलेल्या झोपडपट्ट्यांची अतिक्रमणे सुमारे 25 हेक्टरवर आहेत. यापैकी पाच हेक्टर क्षेत्र अतिक्रमणमुक्त केल्याची माहिती अधीक्षक अभियंता पृथ्वीराज फाळके यांनी दिली.

# बारामती पोटनिवडणुकीत PRO ॲप अनिवार्य

## मतदानाची माहिती थेट आयोगापर्यंत; साहित्य वितरण पद्धतीतही सुधारणा, पारदर्शकतेवर भर

बारामती (दै. संध्या)

बारामती विधानसभा पोटनिवडणुकीच्या पार्श्वभूमीवर मुख्य निवडणूक अधिकारी एस. चोकलिंगम यांनी नोडल अधिकारी व झोनल (क्षेत्रीय) अधिकाऱ्यांची बैठक घेऊन निवडणूक प्रक्रियेतील केलेल्या महत्त्वपूर्ण बदलांबाबत मार्गदर्शन केले.



या वेळी निवडणूक आयोगाने नव्याने अमलात आणलेल्या दोन प्रमुख बदलांवर विशेष भर देण्यात आला. यंदाच्या निवडणुकीत पीआरओ ॲपचा वापर अनिवार्य केला आहे. यामुळे केंद्रावरील मतदानाची अचूक आकडेवारी तत्काळ मिळणे शक्य होणार आहे.

यापूर्वी मतदान केंद्राध्यक्ष मतदानाची माहिती मोबाईलद्वारे विविध स्तरांमार्फत पोहोचविली जात होती. मात्र, आता केंद्राध्यक्षांनी मतदानासंदर्भातील सर्व माहिती थेट या ॲपद्वारे नोंदवायची आहे.

त्यामुळे माहिती प्रसारित होण्याच्या प्रक्रियेत असलेले मधले टप्पे कमी होऊन थेट मतदान केंद्रावरून निवडणूक आयोगापर्यंत माहिती पोहोचणार आहे. तसेच मतदानाची एकूण संख्या व टक्केवारी यांसारखी महत्त्वाची माहिती सर्वसामान्य नागरिकांनाही पाहण्यासाठी उपलब्ध होणार असल्याने पारदर्शकतेत लक्षणीय वाढ होणार आहे.

यासोबतच निवडणूक साहित्य वितरण प्रक्रियेतही महत्त्वाचा बदल करण्यात आला आहे. यापूर्वी कर्मचाऱ्यांना साहित्य घेण्यासाठी ठराविक केंद्रावर उपस्थित राहावे लागत होते. मात्र, नव्या पद्धतीनुसार क्षेत्रीय अधिकारी मतदानाच्या आदल्या दिवशीच संबंधित मतदान केंद्रांवर जाऊन आवश्यक साहित्य कर्मचाऱ्यांना वितरीत करणार आहेत. तसेच मतदान प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर तेच अधिकारी संबंधित साहित्य परत गोळा करून आणणार असल्याने कर्मचाऱ्यांचा ताण कमी होऊन वेळेचीही बचत होणार आहे.

चोकलिंगम यांनी या दोन्ही बदलांचे महत्त्व अधोरेखित करत अधिकारी व कर्मचाऱ्यांनी या प्रक्रियेचे काटेकोर पालन करावे, असे निर्देश दिले. या वेळी निवडणूक निरीक्षक विद्यानंद सिंग, निवडणूक निर्णय अधिकारी उत्तम दिघे, सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी स्वप्निल रावडे व किशोर माने, उपविभागीय पोलिस अधिकारी सुदर्शन राठोड यांच्यासह सर्व नोडल व क्षेत्रीय अधिकारी उपस्थित होते.